cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-२२ | शुक्रवार दि.१० एप्रिल २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### ‘शस्त्रसंधी की वादळापूर्वीची शांतता?’

अमेरिकाइस्त्रायल आणि इराण यांच्यात तब्बल दीड महिना धुमसत राहिलेल्या संघर्षानंतर जाहीर झालेली दोन आठवड्यांची शस्त्रसंधी ही जगासाठी केवळ तात्पुरती उसंत आहे, स्थैर्याची हमी नव्हे. या अल्पविरामामागे शांततेची इच्छा कमी आणि युद्धातून सावरून पुढील डावपेच आखण्याची गरज अधिक असल्याचे स्पष्ट दिसते. त्यामुळेच जगभरातील नागरिकांनी घेतलेला सुटकेचा नि:श्वास हा दिलासा असला तरी तो दीर्घकाळ टिकेल, याची खात्री देता येत नाही.

# खरीप २०२६ साठी खतांचा ‘बफर स्टॉक’ तयार; शेतकऱ्यांना वेळेवर युरिया-डीएपी मिळणार

**राज्यात १.५० लाख टन युरिया व २५ हजार टन डीएपीचा संरक्षित साठा; वितरणासाठी नोडल एजन्सींना लक्षांक वाटप**

पुणे । प्रतिनिधी

**खरीप हंगाम २०२६ मध्ये राज्यातील शेतकऱ्यांना मागणीनुसार आणि वेळेवर खतांचा पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी राज्य शासनाने मोठा निर्णय घेतला असून, १ लाख ५० हजार टन युरिया व २५ हजार टन डीएपी खताचा संरक्षित साठा (बफर स्टॉक) ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या संदर्भात नोडल एजन्सी तसेच जिल्हानिहाय लक्षांक वाटप करण्यात आले आहे.**



राज्य शासनाने महाराष्ट्र राज्य कृषी उद्योग विकास महामंडळ, मुंबई, विदर्भ को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन, नागपूर, महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन, मुंबई आणि महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ, पुणे या संस्थांना नोडल एजन्सी म्हणून नियुक्त केले आहे. त्यांच्या माध्यमातून खतांचा साठा उभारण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. योजनेनुसार ३१ ऑगस्टपर्यंत युरिया व डीएपी खताचा बफर स्टॉक तयार ठेवण्यात येणार आहे. युरिया साठ्यासाठी महाराष्ट्र कृषी उद्योग महामंडळाला ८० हजार टन, विदर्भ फेडरेशनला ३० हजार टन, महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह फेडरेशनला ३६ हजार टन आणि सहकार विकास महामंडळाला ४ हजार टन लक्ष्य देण्यात आले आहे. तसेच डीएपी साठ्यासाठी महाराष्ट्र कृषी उद्योग महामंडळाला १४,२०० टन, विदर्भ फेडरेशनला ६,१०० टन, महाराष्ट्र स्टेट फेडरेशनला ४,३०० टन आणि सहकार विकास महामंडळाला ४०० टन लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे. जिल्हास्तरावर खत साठ्याचे नियोजन आणि देखरेख करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सदस्य सचिव असतील. तसेच कृषी विकास ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### पंतप्रधान मोदी यांची सहा आश्वासने

कोलकाता: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी पश्चिम बंगालच्या जनतेला सहा आश्वासने दिली, तसेच राज्यातील आर्थिक गैरव्यवस्थापन आणि ढासळत्या कायद्याच्या राज्यावरून तृणमूल काँग्रेसवर हल्लाबोल केला. हल्दिया येथील सभेत बोलताना पंतप्रधान मोदींनी, पश्चिम बंगालमध्ये सत्तेवर आल्यास कायद्याचे राज्य प्रस्थापित करण्याचे, प्रशासनात पारदर्शकता आणण्याचे, भ्रष्टाचाराच्या प्रत्येक प्रकरणाची चौकशी करण्याचे, घुसखोरांना हाकलून देण्याचे आणि सातवा वेतन आयोग लागू करण्याचे आश्वासन दिले. मी तुम्हाला खात्री देतो की भाजप संविधानानुसार काम करेल. प्रत्येकाला त्याचा हक्क मिळेल आणि ही मोदींची हमी आहे, असे ते आपल्या सहा आश्वासनांची घोषणा करताना म्हणाले.

### पाकची नोबेल शांतता पुरस्काराची मागणी

इस्लामाबाद: अमेरिका आणि इराणमध्ये बुधवारी झालेल्या सशर्त युद्धविरामाचे श्रेय घेण्यासाठी पाकिस्तानचा जोरदार आटापिटा सुरू आहे. आता पाकिस्तानला नोबेल शांतता पुरस्कार देण्याची मागणी केली जात आहे. ही मागणी म्हणजे अजबच विनोद आणि अत्यंत हास्यास्पद वाटते. स्थानिक माध्यमे आणि काही संघटना पाकिस्तानला नोबेल शांतता पुरस्कार देण्याची मागणी करत आहेत. खरेतर, युद्धविरामाची घोषणा करताना अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शहबाज शरीफ आणि मुनीर यांचा उल्लेख केला होता. पाकिस्तानातील स्थानिक माध्यमे हाचीच चर्चा करत आपला अजेंडा पुढे रेटताना दिसत आहे आणि नोबेल शांतता पुरस्काराची मागणी करत आहेत. युद्धविरामासाठी मध्यस्थी करण्यात पाकिस्तानच्या भूमिकेवर माध्यमे सातत्याने प्रकाश टाकत आहेत आणि त्याचे श्रेय स्वत:कडे घेत आहेत. यासाठी पंतप्रधान शहबाज शरीफ आणि आसिम मुनीर यांना नोबेल शांतता पुरस्कार मिळावा, अशी मागणी ते करत आहेत. निवृत्त लेफ्टनंट कर्नल सय्यद अहमद नदीम कादरी यांनी द नेशनमधील लेखात म्हटले की, पाकिस्तानने जागतिक ऊर्जा पुरवठा स्थिर केला आणि मोठे युद्ध रोखले. कराची चेंबर ऑफ कॉमर्सनेही याचे पूर्ण श्रेय शरीफ आणि मुनीर यांना दिले आहे.

### डीपीटी लस खासगी कंपनीला देऊ नका-पाटील

मुंबई: डीपीटी (घटसर्प, डांग्या खोकला, धनुर्वात) लसीचा सीड स्ट्रेन खासगी कंपनीला विकण्याचा प्रस्ताव रद्द तात्काळ रद्द करण्यात यावा याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिले आहे. जयंत पाटील आपल्या पत्रात म्हटले आहेत की, मुंबईच्या हाफकिन बायो फार्मास्यूटिकल कॉर्पोरेशनचे लसीकरणात फार मोठे योगदान आहे. डी पी टी (घटसर्प, डांग्या खोकला, धनुर्वात) लसीचे उत्पादन करण्याची क्षमता हाफकिनकडे आहे. ही अत्यंत दुर्मिळ व अमूल्य जैव संपत्ती असून तिचे बाजार मूल्य हजारो कोटी रुपयांच्या घरात आहे. मात्र रिलायन्स लाईफ सायन्स या खाजगी कंपनीने ही सीड स्ट्रेन व्यावसायिक अटींवर विकत घेण्याचा प्रस्ताव दिल्यानंतर शासन पातळीवर लगेचच विक्री प्रक्रिया सुरू झाल्याचे दिसते. एका खाजगी कंपनीच्या मागणीवरून अशी मौल्यवान जैव संपत्तीची विक्री प्रक्रिया सुरू होणे हे अत्यंत चिंताजनक आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.०९ एप्रिल २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १६१.०० क्विंटल | १,९०२ | २,५६१ | २,२७५ |
| ज्वारी/हायब्रिड: १७३.५० क्विंटल | १,९०१ | ४,३०१ | २,९७६ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १.५० क्विंटल | ७,४३० | ७,४३० | ७,४३० |
| उडीद : २.५० क्विंटल | ६,३५४ | ६,३५४ | ६,३५४ |
| बाजरी: ७२.०० क्विंटल | २,१०० | २,७२० | २,४३२ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: १८.५० क्विंटल | ५,५०० | ५,५०० | ५,५०० |
| हरभरा:३६.५० क्विंटल | ३,७१० | ५,१७५ | ४,८९१ |

# गहिनीनाथ गडाच्या विकासासाठी कटिबद्ध-मुख्यमंत्री फडणवीस

**लाखो भाविकांच्या उपस्थितीत नारळी सप्ताह भक्तिमय वातावरणात संपन्न**




बीड । प्रतिनिधी

**म्हसोबावाडी (ता. आष्टी, जि. बीड) येथे पार पडलेल्या श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाच्या ९४ व्या नारळी सप्ताहाच्या समारोप प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत भावनिक शब्दांत आपली भूमिका मांडली. मी येथे मुख्यमंत्री म्हणून नाही, तर गहिनीनाथ महाराजांचा अनुयायी म्हणून नतमस्तक होण्यासाठी आलो आहे. गडाच्या विकासासाठी रस्ता असो वा अन्य कोणताही प्रश्न, तो सोडविण्यास मी कटिबद्ध आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.**

संत वामनभाऊ महाराज यांनी सुरू केलेल्या या पवित्र परंपरेचा समारोप गुरुवारी (दि.९) काल्याच्या कीर्तनाने झाला. यावेळी गहिनीनाथ गडाचे ▶▶ पान २ वर

### आ.मुंडे आ.धस यांच्या गप्पांची चर्चा

आज नारळी सप्ताहच्या सांगता समारोहाच्या व्यासपीठावर राजकीय आरोप करणारे आमदार सुरेश धस आणि आमदार धनंजय मुंडे हे एकमेका शेजारी बसले होते आणि दोघांमध्ये गप्पाही झाल्या. मात्र या दोघांमध्ये झालेल्या गप्पांची चर्चा सर्वत्र सुरू झाली आहे. दोघातील संवाद वाढल्याचे काहींनी समाधान तर दोघांमध्ये चर्चा झाली म्हणजे आता हे सर्व विसरले की काय अशीही चर्चा सुरू झाली.

### धनु भाऊंना मंत्रिमंडळात घेण्याची मागणी

वैकुंठवासी संत वामनभाऊ महाराज यांच्या नारळी सप्ताहाची सांगता कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत असताना जमलेल्या भाविक भक्ता मधून एकाने उठून थेट मुख्यमंत्र्याकडेच मागणी केली की, आपण गड दत्तक घेतला, तुम्ही आम्हाला संभाळत आहात. तसे आता धनु भाऊ यांनाही सांभाळून घ्या, असे म्हणत त्यांना मंत्रिमंडळात घेण्याची मागणी भक्तांनी केली. मुख्यमंत्र्यांनी या भक्ताचे शांतपणे सर्वकाही ऐकून घेतले.



# आसाम, पुदुच्चेरी, केरळमध्ये विक्रमी मतदान

दिल्ली । वृत्तसंस्था

**आसाम, केरळ आणि पुदुच्चेरी येथे गुरुवारी झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये मतदारांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला. सायंकाळी ६ वाजेपर्यंत उपलब्ध आकडेवारीनुसार पुदुच्चेरीत सर्वाधिक ८९.०८ टक्के मतदान झाले, तर आसाममध्ये ८५.०४ टक्के आणि केरळमध्ये ७७.३८ टक्के मतदान नोंदवले गेले.**

आसाममध्ये सर्व १२६ विधानसभा मतदारसंघांमध्ये सायंकाळी ६ वाजेपर्यंत ८५.०४ टक्के मतदान झाले. हे प्रमाण २०२१ मधील ८२.०४ टक्क्यांपेक्षा अधिक आहे. राज्यात भाजप-आघाडी सलग तिसऱ्या कार्यकाळासाठी प्रयत्न करत ▶▶ पान २ वर

# केज तालुक्याचे तहसीलदार राकेश गिड्डे यांचे अपघाती निधन

बीड । प्रतिनिधी

बीडमध्ये पुन्हा भीषण अपघात झाला आहे. लातूर-अंबाजोगाई महामार्गावरच्या नेहरूनगर कॉर्नरवर झालेल्या या अपघातात केज येथे कार्यरत असलेले तहसीलदार राकेश गिड्डे यांचा जागीच मृत्यू झाला. तहसीलदाराच्या मृत्यूने प्रशासकीय कर्मचाऱ्यांवर शोककळा पसरली आहे. गुरूवारी (९ एप्रिल) रोजी पहाटे ही घटना



घडली. लातूर-अंबाजोगाई महामार्गावरील रेणापूर फाट्याजवळ ▶▶ पान २ वर

# सभ्यता, सुसंस्कृतपणा विचारात घेऊन बारामती पोटनिवडणुकीतून काँग्रेसची माघार-सपकाळ

मुंबई । प्रतिनिधी


बारामतीची पोटनिवडणूक लढली पाहिजे अशी काँग्रेस पक्षाची भूमिका होती, काँग्रेसचे हे वैचारिक पाऊल योग्यच आहे, कुठेही थांबता कामा नये ही भूमिका आहे. पण याबरोबर महाराष्ट्राची संस्कृती, समंजस्यपणा, सभ्यता याची एक किनारही आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या दोन्ही गटातील नेत्यांनी संवाद साधून उमेदवारी अर्ज माघारी घेण्याची विनंती केली होती,



त्यानंतर राज्यातील सर्व प्रमुख नेत्यांशी व पक्षश्रेष्ठींशी चर्चा करून बारामतीतून काँग्रेसची उमेदवारी माघारी घेत आहोत, दोन पावले मागे येऊन माघार घेतली असली तरी २०२९ च्या निवडणुकीत बारामतीतून काँग्रेसचा आमदार असेल, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले.

गांधी भवन येथे प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, दिवंगत अजित पवार यांचे काँग्रेस पक्षाशी अनेक वर्ष संबंध होते, हे संबंध लक्षात घेऊन काँग्रेस पक्षाने उमेदवारी मागे घ्यावी अशी विनंती उपमुख्यमंत्री ▶▶ पान २ वर

# शबरीमला २०१८ चा निकाल पुरुषांच्या श्रेष्ठत्वाच्या कल्पनेवर आधारित: केंद्राचे सुप्रीम कोर्टात निवेदन



नवी दिल्ली । वृत्तसंस्था

केरळमधील शबरीमला मंदिरात महिलांच्या प्रवेशावरून सुरू असलेल्या वादाबाबतची सर्वोच्च न्यायालयाचे नऊ न्यायाधीशांचे घटनापीठासमोर सुरु आहे. या प्रकरणामुळे धार्मिक स्थळांमध्ये महिलांच्या प्रवेशाबाबत आणि धार्मिक स्वातंत्र्याच्या व्याप्तीबाबत व्यापक प्रश्न उपस्थित होतात, असा दावा केंद्र सरकारच्या वतीने गुरूवारच्या (दि. ९) सुनावणीवेळी करण्यात आला. केंद्र सरकारच्या वतीने बाजू ▶▶ पान २ वर

# प्रियकराचे क्रूर कृत्य; पेट्रोल पंपावर काम करताना महिलेची गळा चिरून हत्या

संभाजीनगर । प्रतिनिधी

शहरापासून जवळच असलेल्या करमाड येथील गणपती मंदिराशेजारी असलेल्या इंडियन ऑईल पेट्रोल पंपावर गुरुवारी (९ एप्रिल) दुपारी साडेबाराच्या सुमारास एक भयानक घटना घडली. आपल्या कामात व्यस्त असलेल्या पूजा सुदाम गावंडे (वय २७, रा. चितेपिंपळगाव, ह.मु. कुंभेफळ) या ▶▶ पान २ वर



# बाहेरची औषधे लिहिल्यास डॉक्टरांवर होणार कारवाई!

**सरकारी रुग्णालयांतूनच औषध देण्याचे वैद्यकीय अधिष्ठातांना स्पष्ट निर्देश**

मुंबई । प्रतिनिधी

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आणि संलग्न रुग्णालयांमध्ये उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना बाहेरून औषधे खरेदी करण्यास भाग पाडणाऱ्या डॉक्टरांवर आता कठोर कारवाई केली जाणार आहे. रुग्णालयात औषधे उपलब्ध असतानाही बाहेरील प्रिस्क्रिप्शन देण्याच्या प्रकारांवर राज्य सरकारने लगाम घालण्याचा निर्णय घेतला असून, याबाबत वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने सर्व अधिष्ठाता आणि वैद्यकीय अधीक्षकांना स्पष्ट निर्देश दिले आहेत.**



सरकारच्या या निर्णयामुळे गरीब रुग्णांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता असून, सरकारी रुग्णालयांतील पारदर्शकता आणि जबाबदारी अधिक बळकट होणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. या निर्णयामुळे गरीब रुग्णांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता असून, सरकारी रुग्णालयांतील पारदर्शकता आणि जबाबदारी अधिक बळकट होणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. ▶▶ पान २ वर

### तर शिस्तभंगाची कारवाई...

तातडीच्या परिस्थितीत एखादे औषध उपलब्ध नसल्यास ‘स्वीय प्रपंजी निधी’ (पीएलए) मधून त्वरित खरेदी करून रुग्णाला देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय, औषध वितरण प्रणाली पारदर्शक करण्यासाठी स्टॉक रजिस्टर आणि डिजिटल नोंदी अद्ययावत ठेवण्यावरही भर देण्यात आला आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या डॉक्टरांवर प्रशासकीय आणि शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार आहे.

# देशातील ६५ टक्के लोक सकारात्मक दिशेने

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**या वर्षी जगभरात अनेक महत्त्वाचे अडथळे दिसून आले आहेत, ज्यात पश्चिम आशियातील सध्याचा संघर्षही समाविष्ट आहे. जागतिक अर्थव्यवस्थांसाठी आव्हाने वाढली आहेत. संपूर्ण जगातील लोक भविष्याबद्दल चिंतित आहेत आणि निराशा वाढत आहे.**

या दरम्यान, भारत आणि दक्षिण-पूर्व आशियातील काही देशांमध्ये आशेचा किरण कायम आहे. ग्लोबल रिसर्च फर्म इप्सोसने मार्च २०२६ चा एक अहवाल जारी केला आहे. या अहवालाचे शीर्षक व्हॉट वरीज द वर्ल्ड असे आहे, म्हणजेच संपूर्ण जगाला सर्वात जास्त कशाची चिंता आहे. अहवालानुसार, सर्वेक्षण केलेल्या २९ पैकी २३ देशांमधील बहुसंख्य लोक त्यांच्या भविष्याबद्दल नकारात्मक विचार करतात, परंतु भारत, सिंगापूर, मलेशिया, दक्षिण कोरिया ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# ‘शस्त्रसंधी की वादळापूर्वीची शांतता?’


अमेरिकाइस्त्रायल आणि इराण यांच्यात तब्बल दीड महिना धुमसत राहिलेल्या संघर्षानंतर जाहीर झालेली दोन आठवड्यांची शस्त्रसंधी ही जगासाठी केवळ तात्पुरती उसंत आहे, स्थैर्याची हमी नव्हे. या अल्पविरामामागे शांततेची इच्छा कमी आणि युद्धातून सावरून पुढील डावपेच आखण्याची गरज अधिक असल्याचे स्पष्ट दिसते. त्यामुळेच जगभरातील नागरिकांनी घेतलेला सुटकेचा नि:श्वास हा दिलासा असला तरी तो दीर्घकाळ टिकेल, याची खात्री देता येत नाही.

या संघर्षाने आधुनिक युद्धांची भयावहता पुन्हा अधोरेखित केली. पूर्वीच्या युद्धांना काही स्पष्ट उद्दिष्टे, भू-राजकीय कारणे किंवा सामरिक ध्येयधोरणांची पार्श्वभूमी असायची. परंतु सध्याचा संघर्ष हा मोठ्या प्रमाणात अहंकार, वर्चस्व आणि राजकीय प्रतिष्ठेच्या लढाईत परिवर्तित झाल्याचे दिसून आले. डोनाल्ड ट्रम्प यांच्या आक्रमक वक्तव्यांनी आणि बेंजमीन नेतान्याहू यांच्या कठोर भूमिकेने परिस्थिती अधिकच चिघळली. इराणनेही माघार न घेण्याचा निर्धार केल्याने युद्ध अधिक लांबले. या संपूर्ण संघर्षात सर्वात मोठा फटका बसला तो निरपराध नागरिकांना. आखाती प्रदेशातील अर्थव्यवस्था विस्कळीत झाली, व्यापार खंडित झाला आणि तेलाच्या किमतींमध्ये झालेल्या उसळीने जगभरातील महागाई वाढवली. युद्धाचा थेट संबंध नसतानाही अब्जावधी लोकांना त्याचे आर्थिक व सामाजिक परिणाम भोगावे लागले. हीच आधुनिक युद्धांची सर्वात भीषण बाजू आहे. ज्यात रणांगण मर्यादित असते, पण परिणाम जागतिक असतात. या युद्धामागे मांडण्यात आलेले उद्दिष्ट इराणच्या कथित अण्वस्त्र कार्यक्रमाचा नायनाट हेही संशयाच्या भोवऱ्यात आहे. प्रत्यक्षात अशा कोणत्याही ठोस यशाची नोंद समोर आलेली नाही. त्यामुळे या संघर्षाचा खरा हेतू काय होता, हा प्रश्न अधिकच गडद झाला आहे. काही प्रमाणात फायदा झाला असेल, तर तो इस्त्रायलच्या सामरिक स्थितीला बळकटी मिळण्यातच दिसतो. भारताच्या भूमिकेकडे पाहिले तर ती ‘अतितटस्थते’ची उदाहरण ठरते. पारंपरिकदृष्ट्या इराण हा भारताचा महत्त्वाचा मित्रदेश राहिला आहे. ऊर्जा, व्यापार आणि पायाभूत सुविधांमध्ये विशेषतः चाबहार बंदराच्या विकासात दोन्ही देशांमध्ये घनिष्ठ सहकार्य आहे. तरीही या संघर्षात भारताने अत्यंत सावध आणि मूक भूमिका घेतली. आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये संतुलन आवश्यक असले तरी मित्रदेशावरील गंभीर आघातावर साधा निषेधही नोंदवला गेला नाही, ही बाब चिंताजनक म्हणावी लागेल. याउलट, इराणने भारताशी असलेले संबंध कायम ठेवत होर्मुझ सामुद्रधुनी भारतीय जहाजांसाठी खुली ठेवली. यावरून द्विपक्षीय संबंधांची परिपक्वता दिसून येते. मात्र, भारताच्या परराष्ट्र धोरणात अधिक स्पष्टता आणि ठामपणा अपेक्षित असल्याचे या प्रसंगाने अधोरेखित केले आहे.

या संघर्षाने आणखी एक धोकादायक प्रवृत्ती उघड केली, धार्मिक ध्रुवीकरणाचा आंतरराष्ट्रीय राजकारणात होणारा वापर. सामाजिक माध्यमांवर अनेकांनी या युद्धाकडे धर्माच्या चष्म्यातून पाहण्याचा प्रयत्न केला. ही प्रवृत्ती केवळ दिशाभूल करणारी नाही, तर दीर्घकालीन सामाजिक तणाव निर्माण करणारी आहे. जागतिक राजकारण हे हितसंबंध, सामरिक गणिते आणि आर्थिक वास्तवांवर चालते धार्मिक भावनांवर नव्हे. आता शस्त्रसंधीच्या या काळात जागतिक अर्थव्यवस्थेला काही प्रमाणात दिलासा मिळण्याची शक्यता आहे. कच्च्या तेलाच्या किमती स्थिरावल्यास महागाईवर नियंत्रण येऊ शकते. मात्र, हे सर्व तात्पुरतेच ठरू शकते, कारण संघर्षाची मूळ कारणे अजूनही कायम आहेत. खरा प्रश्न असा आहे की, या पंधरवड्यानंतर काय? पुन्हा युद्ध भडकणार की संवादाचा मार्ग स्वीकारला जाणार? इतिहास सांगतो की, अशा शस्त्रसंधी बहुधा पुढील संघर्षाची तयारी असतात. त्यामुळे जागतिक समुदायाने केवळ प्रार्थना न करता ठोस राजनैतिक प्रयत्न करणे आवश्यक आहे. आजच्या या अस्थिर जगात शांतता ही आपोआप मिळत नाही ती जपावी लागते. आणि त्यासाठी केवळ शस्त्रसंधी नव्हे, तर विश्वास, संवाद आणि परस्पर आदर यांची गरज असते. अन्यथा, ही तात्पुरती शांतता ही केवळ पुढील वादळापूर्वीची शांतता ठरेल.

# डॉ.सॅम्युअल हॅनिमन: एक श्रेष्ठ शास्त्रज्ञ

**होमिओपॅथीक शास्त्राचे जनक डॉ. सॅम्युअल हॅनिमन यांच्या २७१ व्या जयंती निमित्त आज दि.१० एप्रिल २०२६ रोजी येथील सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथीक मेडीकल कॉलेज, बीडचे माजी प्राचार्य / संचालक व केंद्रीय होमिओपॅथीक परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. अरूण भस्मे यांनी अनेक ग्रंथांच्या आधारे अनुवादीत केलेला डॉ. सॅम्युअल हॅनिमन यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारा लेख या ठिकाणी प्रसिध्द करण्यात येत आहे.**



भौतिक विकासाने गुंग झालेल्या आजच्या जगातील जनतेला सत्याची मांडणी करताना देखील विचारांची दिशा भौतिक आधारावरच बसविण्याची इच्छा होते. वास्तविक पाहता सत्य शोधण्याची अथवा सिध्द करण्याची आवश्यकता पडू नये कारण, सत्य हे सत्यच आहे परंतू असत्याचा प्रभाव आजपर्यंत सत्यासंबंधी विश्वास असताना कोणीही नाहीसा करू शकला नाही. अणूच्या विभाजनाने उत्पन्न होणाऱ्या शक्तीचा महाभयंकर प्रताप आजच्या अणूयुगात विकासाला व नाशाला किती प्रमाणात प्रभावी ठरू शकतो याचा अनुभव डोळयासमोर दिसल्याने प्रत्येक व्यकती या सिध्दांताच्या संशोधकाला जगातील श्रेष्ठ शास्त्रज्ञांच्या मालिकेत नेऊन बसविते त्याच प्रमाणे प्रत्येक पदार्थातील अणूचे विभाजन विभाजनाच्या कालमयदिपर्यंत नेहने सत्य आहे.

प्राचार्य डॉ.अरुण भस्मे

# जि.प.च्या अतिरिक्त ४८ मुख्याध्यापक, शिक्षकांचे अखेर झाले समायोजन

बीड । प्रतिनिधी

**बीड जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त झालेल्या उर्दू आणि माध्यमाच्या शिक्षक, मुख्याध्यापकांचे रखडलेले समायोजन अखेर शुक्रवार दिनांक ९ एप्रिल २०२६ करण्यात आले. प्रभारी शिक्षणाधिकारी डॉ. किरण कुंवर यांच्या अभ्यासू आणि खमक्या भूमिकेमुळे समायोजन होऊ शकले. मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी अतिरिक्त शिक्षक, मुख्याध्याकांच्या समायोजनाला मान्यता दिली आहे.**

गुरुवारी उर्दू माध्यमाचे १४ शिक्षकापैकी १३, पदवीधर १० पैकी १० जणांचे समायोजन करण्यात आले. सेवानिवृत्तीमुळे एकास सुट देण्यात आली. मराठी माध्यमाच्या २६ मुख्याध्याकांपैकी २५ समायोजन करण्यात आले. दरम्यान उर्दू माध्यमाच्या संघटना पदाधिकारी आणि शिक्षकांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान आणि शिक्षणाधिकारी डॉ. किरण कुंवर यांचे आभार मानले.

# क्रांतीसूर्य महात्मा फुले जयंतीनिमित्त बीडमध्ये शिवकालीन मर्दानी खेळांचे भव्य आयोजन

बीड । प्रतिनिधी

**क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंतीचे औचित्य साधून अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने आयोजित क्रांतीसुर्य महात्मा फुले जयंती उत्सव समितीच्यावतीने आज शुक्रवार दि. १० एप्रिल रोजी शिवकालीन मर्दानी खेळाचे आयोजन करण्यात आले असून याप्रसंगी फुले प्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.**


अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष छगनरावजी भुजबळ साहेब, माजी खासदार समीरभाऊ भुजबळ, आ. पंकजभाऊ भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली आणि समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ॲड. सुभाष राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली बीड शहरांमध्ये क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येत आहे. जयंती उत्सव समितीच्या वतीने जयंतीच्या पूर्वसन्येला शुक्रवार दि. १० एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ७ : ०० वाजता क्रांतीसुर्य महात्मा फुले पुतळा परिसरात भव्य शिवकालीन मर्दानी खेळाचे आयोजन करण्यात आले आहे. डोळ्याचे पारणे फेडणाऱ्या या शिवकालीन या शिवकालीन मर्दानी खेळाच्या प्रात्यक्षिकास बीड शहरातील समता परिषदेचे पदाधिकारी, समता सैनिक, फुलेप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन समता परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष निखिल शिंदे, शहर अध्यक्ष नितीन राऊत, सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष स्वप्नील शिंदे, उपाध्यक्ष आदित्य शिंदे, कोषाध्यक्ष महेश व्यवहारे , सचिव शरद विटकर, सहसचिव रोहित जमदाडे यांच्यासह जयंती उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# कल्पना बोराडे (आकात) हिची पुणे पोलीस पदी निवड

मंठा । प्रतिनिधी

तालुक्यातील पाटोदा ( बारा हनुमान) येथील कल्पना सदाशिव बोराडे-आकात हिने पुणे पोलीस दलात भरती होऊन गावातील पहिली महिला पोलीस म्हणून नावलौकिक मिळवला आहे.

तिच्या निवडीबद्दल गावकऱ्यांच्या वतीने अभिनंदन करण्यात येत आहे. कल्पना हिचे माहेर मंठा तालुक्यातील माळतोंडी येथील असून ज्ञानेश्वर आकात यांची ती मुलगी आहे. कल्पनाचे शिक्षण जि. प. प्राथमिक शाळा माळतोंडी येथे सातवीपर्यंत झाले. तर पुढील शिक्षण वायाळ पांगरी येथील खाजगी शाळेत झाले. तिने बारावी मंठा येथील वरिष्ठ महाविद्यालयात पूर्ण केले. पाटोदा येथील सदाशिव देवीदास बोराडे यांच्याशी विवाह झाल्यानंतर सदाशिव यांनी अत्यंत हलाखीच्या परिस्थितीमुळे पुणे गाठले. तेथेच कल्पनाच्या जीवनाला कलाटणी मिळाली. भाऊ अमोल आकात वनरक्षक असल्याने पोलीस भरतीचे प्राथमिक धडे मिळत होते तसेच पुणे येथील पोलीस अकॅडमीचे प्रशिक्षक सुरज यादव यांचे मोलाचे मार्गदर्शन कल्पनास लाभले. पती सदाशिव बोराडे यांनी पाठबळ दिले असल्याने कल्पना हीचे पोलीस होण्याचे स्वप्न साकार झाले. कल्पनाने आपल्या लहान बाळाचे संगोपन करत रात्रंदिवस अभ्यास करून पतीचे सहकार्य घेत संसाराचा गाडा ओढत पोलीस प्रशिक्षण,मैदानी सराव आणि अभ्यास यामुळेच हे यशाचे शिखर संपादन केले असल्याचे कल्पनाने प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.



# वाहतुकीचा नियमाचे पालन करावे नसता कारवाई होणार-पो.नि.देशमुख

मंठा । प्रतिनिधी

**मंठा शहरातील वाहतूक व्यवस्थेला वळण लावण्यासाठी तसेच वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर मंठा पोलिसांनी गुरुवारी सकाळी बेशिस्त वाहन चालकावर कारवाईची मोहीम सुरू केली आहे. सर्वांनी वाहतुकीचे नियमाचे पालन करावे नसतं कारवाई करण्यात येईल असा इशारा पोलीस निरीक्षक श्री देशमुख यांनी दिला आहे.**



तसेच नगरपंचायतकडून पथविक्रेत्यांना काही सूचना देण्यात आल्या. वाहतूक व्यवस्थेला वळण लावण्यासाठी पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम देशमुख यांनी गुरुवारी सकाळी कारवाईची विशेष मोहीम हाती घेऊन शहरातील मुख्य रस्त्यावर विविध ठिकाणी ही मोहीम राबवली. नगरपंचायतकडून देखील हातगाडी व पतविक्रेत्यांना विविध सूचना देण्यात आल्या. यावेळी पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम देशमुख , सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश इधाटे , फौजदार विठ्ठल केंद्रे, संतोष माळगे , पोलीस कॉन्स्टेबल आनंद ढवळे , जगन्नाथ सुक्रे , अजय घोडके , आकाश राऊत , संतोष बनकर , सज्जन काकडे , विलास कातकडे तसेच नगरपंचायतचे स्वच्छता निरीक्षक वैभव पुणेकर व स्वच्छता कर्मचारी उपस्थित होते.

पान १ वरून...

### खरीप २०२६ साठी खतांचा ‘बफर स्टॉक’

अधिकारी, संबंधित नोडल एजन्सीचे प्रतिनिधी आणि खत विक्रेते यांचा समितीत समावेश आहे. खतांचा साठा टप्प्याटप्प्याने वितरित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. डीएपी खताचा साठा १५ जुलैपूर्वी आणि युरिया खताचा साठा १५ ऑगस्टपूर्वी खुला करण्याचे निर्देश कृषी विभागाने दिले आहेत. यामुळे खरीप हंगामात शेतकऱ्यांना खतांची टंचाई भासणार नाही, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

------------

### आसाम, पुदुच्चेरी, केरळमध्य

आहे, तर काँग्रेस सत्तेत पुनरागमनासाठी प्रयत्नशील आहे. केरळमध्ये सर्व १४० जागांसाठी मतदान पार पडले. सायंकाळी ६ वाजेपर्यंत ७७.३८ टक्के मतदान झाले असून, हे २०२१ मधील ७४.०६ टक्क्यांपेक्षा थोडे अधिक आहे. मतदानाची वेळ संपल्यानंतरही केंद्रांवर उपस्थित असलेल्या मतदारांना टोकन देऊन मतदानाची संधी देण्यात आली. पुदुच्चेरी या केंद्रशासित प्रदेशातील ३० मतदारसंघांमध्येही मतदान प्रक्रिया सायंकाळी ६ वाजता पूर्ण झाली. प्राथमिक अंदाजानुसार येथे ८९ टक्क्यांहून अधिक मतदान झाले आहे. येथे एनडीए सत्तेत कायम राहण्यासाठी प्रयत्न करत आहे, तर काँग्रेस-नेतृत्वाखालील आघाडी सत्तेत येण्याच्या प्रयत्नात आहे. स्थानिक स्वायत्तता आणि प्रशासनातील मतभेद हे प्रचारातील प्रमुख मुद्दे ठरले.

---------------

### गहिनीनाथ गडाच्या विकासासाठी

विठ्ठल महाराज, राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, आमदार सुरेश धस, आमदार धनंजय मुंडे, माजी आमदार भीमराव धोंडे, माजी आमदार साहेबराव दरेकर, माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, बाळासाहेब आजबे, प्रताप ढाकणे, सरपंच शिवा शेकडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, संत वामनभाऊ यांनी केलेले कार्य अविस्मरणीय आहे. नाथ संप्रदायात गहिनीनाथांचे महात्म्य मोठे असून, या गडावर प्रत्येक काम अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडते, हे मी प्रत्यक्ष अनुभवले आहे. विशेष म्हणजे, या नारळी सप्ताहाचे नियोजन २०३९ पर्यंत निश्चित झाले आहेत यातच या भक्तीकार्याचे यश दिसते. समाजाला एकत्र आणण्याचे हे काम अतिशय मोलाचे आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले. पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी, गहिनीनाथ गडाचा नारळी सप्ताह कायमस्वरूपी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या यजमानपदाखाली व्हावा व त्यांनी गड दत्तक घ्यावा, अशी मागणी केली. तसेच स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या कार्याच्या आठवणींना उजाळा देत, त्यांच्या विचारांवर आपण काम करत असल्याचे त्यांनी सांगितले. आमदार धनंजय मुंडे म्हणाले की, संत वामनभाऊ यांनी सुरू केलेला हा सप्ताह महंत विठ्ठल महाराज यांच्या जन्मगावी होत आहे, हा योगायोग विशेष आहे. गेल्या २५ वर्षांपासून मला येथे पूजनाचा मान मिळत आहे. दरम्यान, आमदार सुरेश धस यांनी नगर-बीड महामार्गाच्या कामासाठी भरीव निधी देण्याची मागणी करत, या रस्त्यावर होणाऱ्या अपघातांकडे मुख्यमंत्री यांनी विशेष लक्ष द्यावे, असे आवाहन केले. या नारळी सप्ताहाच्या निमित्ताने भाविकांची मोठी गर्दी झाली होती.

---------------

### सभ्यता, सुसंस्कृतपणा विचारात घेऊन

सुनेत्रा पवार यांनी केली. तसेच त्यांच्या पक्षातील ज्येष्ठ नेते मंत्री छगन भुजबळ, माजी मंत्री धनंजय मुंडे यांनीही फोन करून उमेदवारी मागे घेण्याची विनंती केली. राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री मकरंद आबा पाटील यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार मनोज कायंदे, संजय खोडके, सना मलिक, राजेश विटेकर यांच्या शिष्टमंडळाने गांधी भवनला येऊन भेट घेत उमेदवार मागे घेण्याची विनंती केली होती. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (श.प.) आमदार रोहित पवार यांनीही सकाळी भेट घेऊन उमेदवारी मागे घेण्याची विनंती केली. खा. सुप्रिया सुळे यांनीही फोन केला होता. शरद पवार साहेबांनी ही भावना व्यक्त केल्या होत्या. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांच्याशीही फोन करून संवाद साधला, त्यांच्या विनंतीनंतर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, पक्षप्रभारी रमेश चेन्नीथला व राज्यातील काँग्रेसच्या सर्व वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करून बारामतीतून उमेदवारी मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हर्षवर्धन सपकाळ पुढे बोलताना म्हणाले की, बारामतीतून काँग्रेस पक्षाने उमेदावारी मागे घेतली असली तरी अजित पवार यांच्या निधनाची चौकशी व्हावी या भूमिकेवर काँग्रेस पक्ष ठाम आहे. तसेच भाजपासारख्या विषारी व विखारी पक्षासोबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने सत्तेसाठी केलेली आघाडी न पटणारी व न रुचणारी आहे, त्याला आजही काँग्रेसचा विरोध कायम आहे, असे त्यांनी सांगितले. पत्रकारांनी विचारलेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा फोन आला होता आणि बारामतीची निवडणूक बिनविरोध व्हावी अशी विनंती त्यांनी केली होती, यावेळी त्यांनी महाराष्ट्र संस्कृती हा शब्दही वापरला पण त्यांचा फोन व उमेदवारी माघारी घेणे याचा काहीही संबंध नाही. भाजपाला काँग्रेस पक्षाचा विरोध आहे व तो कायम असेल, असेही स्पष्ट केले. उमेदवारी मागे घेण्याचा निर्णय घेण्यापूर्वी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी बारामती पोटनिवडणुकीसाठी काँग्रेस उमेदवार ॲड. आकाश मोरे यांच्यासह इतर चार इच्छुक उमेदवार व बारामतीतील काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांशी व्हिडिओ कॉल वर संवाद साधून त्यांच्या भावना जाणून घेतल्या व त्यानंतर निर्णय जाहीर केला.

-----------

### केज तालुक्याचे तहसीलदार

भीषण कार अपघातात झाला. या कार अपघातात गिड्डे यांचा मृत्यू झाला. राकेश गिड्डे हे स्वत:च्या कारने प्रवास करत होते, त्यावेळी त्यांच्या वाहनाचा अपघात झाला. माहितीनुसार, ते कारमध्ये एकटेच होते. अचानक वेग वाढल्याने नियंत्रण गमावून त्यांची कार उलटली, असा अंदाज रेणापूर पोलिसांनी वर्तवला आहे. या अपघाताची तीव्रता इतकी होती की, या घटनेत त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी तातडीने धाव घेतली. पोलिसांनी त्यांचा मृतदेह पोस्टमार्टमसाठी रेणापूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केला. एक कार्यक्षम आणि तरुण अधिकाऱ्याच्या अशा अचानक जाण्याने महसूल प्रशासनासह संपूर्ण केज तालुक्यावर मोठी शोककळा पसरली आहे. पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत. यापुर्वी, अंबाजोगाई शहरातील रिंग रोडवर बुधवारी भीषण अपघात झाला. या अपघातात बँक अधिकाऱ्याचा जागीच मृत्यू झाला. भरधाव ट्रकने त्यांच्या दुचाकीला धडक दिल्याने त्यांचा मृत्यू झाला. बुधवारी बँक अधिकारी आणि गुरूवारी तहसीलदाराचा अपघाती मृत्यू झाल्याने रस्ते वाहतुकीच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

---------

### प्रियकराचे क्रूर कृत्य; पेट्रोल पंपावर

महिलेचा तिचा प्रियकर सत्यम रावसाहेब गावंडे (रा. चितेपिंपळगाव) याने चाकूने गळा चिरून निघृण खून केला. या हल्ल्यात पूजा यांचा जागीच मृत्यू झाला असून, घटनेनंतर परिसरात मोठी खळबळ उडाली. मिळालेल्या माहितीनुसार, पूजा गावंडे या नेहमीप्रमाणे पेट्रोल पंपावर आपले कर्तव्य बजावत होत्या. दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास आरोपी सत्यम गावंडे तिथे पोहोचला. दोघांमध्ये काही काळ वाद झाला आणि संतापाच्या भरात सत्यमने जवळ असलेला तीक्ष्ण चाकू काढून पूजा यांच्या गळ्यावर वार केले. गळा चिरला गेल्याने मोठ्या प्रमाणावर रक्तस्त्राव होऊन पूजा यांचा जागीच प्राण गेला. भरदिवसा आणि वर्दळीच्या ठिकाणी घडलेल्या या प्रकारामुळे उपस्थित नागरिक आणि कर्मचारी भयभीत झाले. घटनेची माहिती मिळताच करमाड पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक दिलीप चौरे, जमादार शिवाजी मादेवाड, विनोद खिल्लारे यांच्यासह पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन उत्तरीय तपासणीसाठी पाठवला. प्राथमिक माहितीनुसार, प्रेमप्रकरणातून हा खून झाल्याचा संशय असून, पोलिसांनी आरोपी सत्यम गावंडेचा शोध घेण्यासाठी पथके रवाना केली आहेत. भरवस्तीत आणि सार्वजनिक ठिकाणी घडलेल्या या खुनामुळे महिला सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

--------------

### शबरीमला २०१८ चा निकाल

मांडताना सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सांगितले की, हे प्रकरण कोणत्याही एका लिंगाची बाजू घेणे किंवा त्याला विरोध करणे याबद्दल नसून, ते धार्मिक परंपरा आणि श्रद्धांशी संबंधित आहे. उदाहरणे देत त्यांनी निदर्शनास आणून दिले की, देशभरात अशी अनेक मंदिरे आहेत जिथे पुरुषांच्या प्रवेशावरही निर्बंध आहेत, किंवा जिथे पुरुषांना विशिष्ट परंपरांचे पालन करणे अनिवार्य असते. सुनावणीदरम्यान, केरळमधील कोट्टनकुलंगारा श्री देवी मंदिरात पुरुष पारंपारिकपणे महिलांप्रमाणेच साडी नेसून पूजा-अर्चा करतात, या गोष्टीवरही प्रकाश टाकण्यात आला. ही परंपरा अनेक वर्षांपासून चालत आली आहे आणि ती धार्मिक श्रद्धांचा एक अविभाज्य भाग आहे. प्रत्येक धार्मिक स्थळाच्या स्वतःच्या अशा विशिष्ट परंपरा असतात आणि त्याकडे एकाच, समान दृष्टिकोनातून पाहिले जाऊ शकत नाही, असा युक्तिवाद केंद्र सरकारने केला आहे. सुनावणीच्या प्रक्रियेदरम्यान, अतिरिक्त सॉलिसिटर जनरल के.एम. नटराज यांनी संविधानाच्या अनुच्छेद २५ आणि २६ चा अर्थ स्पष्ट करताना काही महत्त्वाचे युक्तिवाद मांडले. धार्मिक अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी अनुच्छेद २५ आणि २६ अंतर्गत एक त्रि-स्तरीय यंत्रणा अस्तित्वात आहे, असे नटराज यांनी न्यायालयासमोर नमूद केले.

------------

### देशातील ६५ टक्के लोक

आणि थायलंडसारखे देश या प्रवृत्तीपासून वेगळे आहेत. सर्वेक्षणामध्ये समाविष्ट असलेल्या भारतातील ६५% लोकांचे मत आहे की देश योग्य दिशेने वाटचाल करत आहे. जगात हे सरासरी प्रमाण केवळ ३९% आहे. सर्वेक्षणामध्ये नागरिकांची प्रमुख राष्ट्रीय मुद्यांवरील मते देखील समाविष्ट करण्यात आली आहेत, जे त्यांच्या दैनंदिन जीवनावर थेट परिणाम करतात. सर्वेक्षणामध्ये अनेक लोकांनी मान्य केले आहे की तेल आणि वायू पुरवठ्यावरील वाढता दबाव भविष्यात एक आव्हान बनू शकतो. जागतिक चिंतांमध्ये गुन्हेगारी, हिंसा, बेरोजगारी, महागाई, गरिबी आणि सामाजिक असमानता, आर्थिक आणि राजकीय भ्रष्टाचार प्रमुख आहेत. भारतातही अशाच प्रकारच्या चिंता दिसून येतात, परंतु प्राधान्यक्रमाचा क्रम वेगळा आहे. महागाई, बेरोजगारी, शिक्षण, गुन्हेगारी आणि हिंसा याव्यतिरिक्त आर्थिक आणि राजकीय भ्रष्टाचार या भारतीयांच्या सर्वात मोठ्या चिंता आहेत. इप्सोस इंडियाच्या अहवालानुसार, भारतातील लोकांच्या सकारात्मक विचारांमागे अनेक कारणे आहेत. भारताची तटस्थ भू-राजकीय स्थिती आणि जागतिक इंधन संकटाचा प्रभाव कमी करण्यासाठी केलेल्या सक्रिय प्रयत्नांमुळे अर्थव्यवस्था तुलनेने स्थिर राहिली आहे. या सर्व चिंता एका सामायिक जागतिक चिंतेकडे निर्देश करतात. ही अस्वस्थता ब-याच अंशी सतत होत असलेल्या भू-राजकीय तणावांमुळे निर्माण झाली आहे. गेल्या काही वर्षांत या तणावांनी आणि संघर्षांनी जगभरातील अर्थव्यवस्थेवर परिणाम केला आहे, पुरवठा साखळ्यांवर दबाव आणला आहे आणि नागरिकांसाठी कठीण परिस्थिती निर्माण केली आहे.

------------

### बाहेरची औषधे लिहिल्यास

सरकारी रुग्णालयांमध्ये मोफत किंवा सवलतीच्या दरात औषधे मिळणे अपेक्षित असताना अनेक ठिकाणी रुग्णांना खासगी मेडिकलमधून औषधे घेण्यास सांगितले जात असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत होत्या. याची गंभीर दखल घेत प्रशासनाने आता ‘झीरो टॉलरन्स’ भूमिका घेतली आहे. नव्या निर्देशांनुसार, प्रत्येक रुग्णाला आवश्यक औषधे रुग्णालयाच्या साठ्यातूनच उपलब्ध करून देणे बंधनकारक करण्यात आले आहे. विशेष उपचारासाठी आवश्यक आणि शासनाच्या सुचीबाहेरील औषधांशिवाय अन्य कोणत्याही कारणासाठी रुग्णांना बाहेरून औषधे खरेदी करण्यास सांगता येणार नाही. औषध साठा अपुरा पडू नये यासाठी रुग्णालयांनी नियमित आढावा घेण्याचेही निर्देश दिले.

## थोडक्यात

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भरगच्च कार्यक्रम

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी शहरातील बीड नगर रोड लगत असलेला डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यानामध्ये दिनांक ९ एप्रिल ते १३ एप्रिल दरम्यान विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे जयंती समितीचे अध्यक्ष सुनील शिंदे सरांनी आमच्या माहिती दिली विश्वरत्न महारत्न यांनी भारताला राज्यघटना दिली असे महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती १४ एप्रिल रोजी सर्व भारत भर मोठ्या हर्ष उल्हासात साजरी केली जाते आष्टी शहरात देखील जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन पुढील प्रमाणे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर १३५ वी सार्वजनिक नक जयंती महोत्सव आष्टी, जि. बीड आयोजित भीम संदेश पर्व २०२६ कार्यक्रमाची रुपरेषा या सर्व कार्यक्रमामधील मुख्य आकर्षण शनिवारी ११ एप्रिलला होणारा कार्यक्रम शनिवार दि. ११/०४/२०२६ रोजी, सायं.०६.३० वा. आयु. विकास राजा (नागपूर) (महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक व प्रबोधनकार) गुरुवार दि. ०९/०४/२०२६ रोजी, सायं.०६.३० वा. आयु. अविनाश भारती (परभणी) (महाराष्ट्रातील प्रसिध्द व्याख्याते, फुले-शिव-शाहू आंबेडकरी विचारांचे भाष्यकार) शुक्रवार दि. १०/०४/२०२६ रोजी, सायं. ०६.३० वा. आयु. कडूताई खरात (महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायिका) रविवार दि. १२/०४/२०२६ रोजी, सायं. ०६.३० वा, आयु. प्रा. जावेद पाशा कुरेशी (प्रसिद्ध साहित्यिक व फुले-शिव-शाही विचारवंत) वरील सर्व कार्यक्रमांचे ठिकाण: विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान, आष्टी. मंगळवार दि. १४/०४/२०२६ रोजी, सकाळी. ०९ : ३० वा. मुख्य निल ध्वजारोहन व बुद्ध वंदना स्थळ : संकल्प बुद्धविहार आष्टी व सकाळी १० : ३० वा. निल ध्वजारोहन विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान आष्टी. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक सायं. ०४ ते रात्री १२ वा. पर्यंत. टिप : सर्व कार्यक्रम वेळेवर सुरु होतील. आपली उपस्थिती ही वेळेवर महत्वाची आहे.

### बंधपत्राचा भंग केल्याप्रकरणी पोलिसांची मोठी कारवाई; ७ आरोपींची कारागृहात रवानगी

बीड: सार्वजनिक शांतता आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी बीड पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवाईचा बडगा उगारला आहे. दिलेल्या बंधपत्राचा () भंग केल्याप्रकरणी कलम १४१ बी.एन.एस.एस. अंतर्गत कारवाई करत, बीड पोलिसांनी ७ आरोपींना जिल्हा कारागृहात धाडले आहे.

बीड ग्रामीण पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या कुमशी (ता. जि. बीड) येथील ७ आरोपींनी यापूर्वी कलम १२६ बी.एन.एस.एस. अन्वये सार्वजनिक शांतता राखण्यासाठी अंतिम बंधपत्र लिहून दिले होते. मात्र, या आरोपींनी या बंधपत्रातील अटींचा भंग केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले. या अहवालाच्या आधारे विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, बीड यांनी दि. ०७/०४/२०२६ रोजी संबंधित आरोपींविरुद्ध रिमांड वॉरंट जारी केले. १) अंगद कोंडीराम निकम (वय ४४ वर्ष) २) बाळू मदन करपे (वय ३८ वर्ष) ३) सुरेश बाबुराव उगले (वय ५१ वर्ष) ४) अभिषेक हनुमान करपे (वय २४ वर्ष) ५) मनोज राजेंद्र करपे (वय २८ वर्ष) ६) रविंद्र रामप्रसाद करपे (वय २९ वर्ष) ७) प्रदीप मुरलीधर करपे (वय २८ वर्ष) (सर्व रा. कुमशी).

या सातही आरोपींची उर्वरित कालावधीसाठी जिल्हा कारागृह, बीड येथे रवानगी करण्यात आली आहे. या आरोपींना आता दि. ०१/०७/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांसमोर हजर केले जाणार आहे.

पोलिसांचा इशारा:

सार्वजनिक शांतता व कायदा सुव्यवस्था बिघडवणाऱ्यांची गय केली जाणार नाही. ज्या गुन्हेगारांना प्रतिबंधात्मक नोटिसा किंवा बंधपत्र देण्यात आले आहेत, त्यांनी अटींचा भंग केल्यास त्यांच्यावर अशीच कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा बीड पोलीस दलाने दिला आहे.

# प्रशासकीय टोलवाटोलवीत पाटोद्याचा शेतकरी भरडला अतिवृष्टीतील विहिरींच्या नुकसानीची मदत अधांतरीच!

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या विहिरींचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. मात्र, या नुकसानीची भरपाई मिळण्याऐवजी शेतकरी आता सरकारी कार्यालयांच्या उंबरठ्या झिजवताना दिसत आहेत. नगरपंचायत, तहसील कार्यालय आणि पंचायत समिती या तिन्ही संस्थांच्या ''ही जबाबदारी आमची नाही'' या भूमिकेमुळे हतबल झालेल्या शेतकऱ्यांनी आता कर्तद्वार आमदार सुरेश धस यांच्याकडे न्यायाची मागणी केली आहे.

नेमके प्रकरण काय?

पाटोदा नगरपंचायत हद्दीत येणाऱ्या शेतकरी बांधवांच्या विहिरींचे अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान झाले होते. सुरुवातीला नियमानुसार नगरपंचायतीने या विहिरींचे पंचनामे केले. हे पंचनामे झाल्यानंतर मदतीची प्रक्रिया पुढे सरकण्याऐवजी ती कागदी घोळ्यात अडकली आहे. नगरपंचायतीने हे पंचनामे तहसील कार्यालयाकडे वर्ग केले, तर तहसीलने ते पंचायत समितीकडे पाठवले. आता पंचायत समितीचे अधिकारी ''मदत नगरपंचायत अंतर्गत होईल'' असे सांगून हात झटकत आहेत.

शासकीय नियमांचा पेच की अधिकाऱ्यांची अनास्था?

नगरपंचायत प्रशासनाचे म्हणणे आहे की, अतिवृष्टीची मदत देण्याचे अधिकार त्यांच्याकडे नाहीत. दुसरीकडे, पंचायत समिती सांगते की आम्ही शासनाला कळवले आहे. या तांत्रिक वादात सामान्य शेतकरी मात्र भरडला जात आहे. शेतीसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या विहिरी खचल्याने



किंवा गाळाने भरल्याने यंदाच्या हंगामावरही संकट आले आहे. मात्र, प्रशासकीय अधिकारी एका टेबलावरून दुसऱ्या टेबलावर फाईल टोलवत असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

आमदार सुरेश धस यांच्याकडून अपेक्षा

**आमदार सुरेश धस यांच्याकडे शेतकऱ्यांची न्यायाची साद; नगरपंचायत, तहसील आणि पंचायत समितीच्या चक्रव्यूहात अडकली मदत**

आष्टी-पाटोदा-पाटोदा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस हे नेहमीच शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेतात. नैसर्गिक आपत्ती असो वा पीकविमा, धस यांनी नेहमीच प्रशासनाला धारेवर धरून शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला आहे. आताही पाटोद्यातील या विहिरींच्या नुकसानीचा प्रश्न त्यांनीच मार्गी लावावा, अशी आर्त हाक शेतकरी मारत आहेत.

शेतकऱ्यांचा सवाल: नेमकी मदत देणार कोण?

''आम्ही महसूल विभागाकडे गेलो की ते नगरपंचायतीकडे बोट दाखवतात, नगरपंचायत पंचायत समितीकडे पाठवते. आम्ही फक्त कागदपत्रे जमा करायची का? आमची विहीर दुरुस्त करण्यासाठी पैसे कधी मिळणार?'' असा संतप्त सवाल पाटोद्यातील पीडित शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे.

जर येत्या काही दिवसांत यावर ठोस निर्णय झाला नाही, तर शेतकऱ्यांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. आता या प्रशासकीय गोंधळात आमदार सुरेश धस कशा प्रकारे हस्तक्षेप करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देतात, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# दर्शनासाठी आलेल्या महिलेचे दागिने चोरणारी महिला जेरबंद; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

बीड । प्रतिनिधी

रामगड येथे दर्शनासाठी आलेल्या एका वृद्ध महिलेच्या गळ्यातील १ लाख ७० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरणाऱ्या महिला आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेने () अटक केली आहे. तिच्याकडून चोरीला गेलेला संपूर्ण मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे.

घटनेचा तपशील:

दिनांक २६ मार्च २०२६ रोजी सोनाबाई रतन वैद्य (वय ७५ वर्षे, रा. घोसापुरी, ता. जि. बीड) या रामगड येथे दर्शनासाठी गेल्या होत्या. यावेळी गर्दीचा फायदा घेऊन एका अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने लंपास केले होते. याप्रकरणी बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात कलम ३०३(२) बी.एन.एस. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस कारवाई:

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी जारवाल, पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर आणि त्यांच्या पथकाने या गुन्ह्याचा समांतर तपास सुरू केला. तपासादरम्यान, हा गुन्हा दुर्पदाबाई परमेश्वर जाधव (रा. गांधीनगर पेठ, बीड) हिने केल्याची खात्रीशीर माहिती पथकाला मिळाली.

मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांनी सापळा रचून संशयित महिला आरोपीला ताब्यात घेतले. तिची सखोल चौकशी केली असता, तिच्याकडून चोरीला गेलेले १,७०,०००/- रुपये किमतीचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले. आरोपी महिलेला पुढील तपासासाठी बीड ग्रामीण पोलिसांच्या हवाली करण्यात आले आहे.

यांनी केली कामगिरी:

सदर कारवाई पोलीस अधीक्षक बीड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. शिवाजी बंटेवाड, सपोनि जारवाल, पीएसआय श्रीराम खटावकर, अंमलदार सोमनाथ गायकवाड, आनंद मस्के, बाळु सानप, स्वाती मुंडे, मनोज परजणे, अश्फाक सय्यद आणि सिध्देश्वर मांजरे यांच्या पथकाने केली आहे.

## पान ६ वरून...

### शिवसैनिकांच्या बळावर

बेरोजगारी, शेतकरी प्रश्न, पाणीटंचाई यांसारख्या मुद्द्यांवर शिवसेना आक्रमक भूमिका घेणार असल्याचे शिंदे यांनी स्पष्ट केले. यावेळी उपनेत्या संगीताताई ठोंबरे यांनीही महिलांनी मोठ्या प्रमाणावर शिवसेनेत सहभागी व्हावे, असे आवाहन केले. यावेळी कार्यक्रमास विजयप्रकाश ठोंबरे, पृथ्वीराज पाटील शिवसेना तालुकाप्रमुख केज, दादासाहेब ससाने विधानसभा प्रमुख केज, दत्तकुमार काकडे युवासेना तालुकाप्रमुख केज, चंद्रशेखर बाप्पा मुकदम ज्येष्ठ नेते, अभिमान बापू पटाईत ज्येष्ठ नेते, आदित्य रांजणकर शेतकरी सेना जिल्हा कार्याध्यक्ष बीड,जयाताई राऊत तालुकाप्रमुख महिला आघाडी, वैशालीताई सांगळे शहर प्रमुख महिला आघाडी, आम्रपाली गजेशिव, विकास काशीद शिवसेना तालुका सचिव, महेंद्र चाटे उपतालुकाप्रमुख, योगेश देशमुख उपतालुकाप्रमुख कैलास उगलमुगले उप तालुकाप्रमुख, सुग्रीव बसवर उपतालुकाप्रमुख, ज्ञानेश्वर भांगे युवासेना उपतालुकाप्रमुख, शिवाजी गायकवाड युवासेना व उपतालुका प्रमुख, किशोर थोरात माजी सरपंच कुंभेफळ, अशोक सक्राते, सुनील पटाईत, शुभम आप्पा गंभीरे ,श्रीराम कदम, शिवशंकर पाटील साबला ,अमोल वळसे पाटील, ज्येष्ठ नेते प्रकाश गुंड, विश्वास जाधव, राजेभाऊ जाधव, पृथ्वीराज इंगळे, दिलावर सिंग गोके, किसन दादा कदमयांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### तुम्ही शिवसेना बळकट करा

राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री व शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब, संसदरत्न खा. डॉ. श्रीकांतजी शिंदे साहेब तसेच शिवसेना सचिव संजयजी मोरे साहेब यांच्या आदेशानुसार, बीड शहरातील हॉटेल ग्रँड यशोदा येथे शिवसेना जिल्हा आढावा बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीत मराठवाडा विभागीय सचिव अशोकजी पटवर्धन साहेब आणि बीड लोकसभा संपर्कप्रमुख मनोजजी शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील संघटनात्मक कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला.मंत्री अबीटकर यांनी कार्यकर्त्यांना संबोधित करताना स्पष्ट शब्दांत सांगितले की, हार-तुरे घेऊन स्वतःची मिरवणूक काढणारा नव्हे, तर जनतेमध्ये राहून त्यांच्या समस्या सोडवणारा कार्यकर्ता खरा असतो. त्यांनी सर्व पदाधिकाऱ्यांना बूथ लेव्हल एजंट बीएलएचे काम प्रामाणिकपणे करण्याचे आवाहन केले. तसेच, प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना न्याय देण्याची परंपरा एकनाथजी शिंदे साहेब यांनी कायम ठेवली असल्याचे सांगत, प्रा. ज्योतीताई वाघमारे यांना राज्यसभा खासदारपदी संधी देऊन त्यांच्या मेहनतीचा सन्मान केल्याचेही त्यांनी नमूद केले. याबरोबरच मराठवाडा विभागीय सचिव अशोकजी पटवर्धन साहेब यांनी सर्व पदाधिकाऱ्यांना संघटन बळकटीसाठी कानमंत्र दिले व जो काम करणार तोच पदावर कायम राहणार असल्याचे ठणकावून सांगितले. तसेच शिवसेनेच्या उपनेत्या संगीताताई ठोंबरे यांनी महिला आघाडी देखील पक्ष संघटनासाठी आपले सर्वोपरी योगदान देत राहील असे आपल्या मनोगतात नमूद केले.या बैठकीत जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन मुळूक, स्वप्नील गलधर आणि चंद्रकांत नवले यांनी कार्य अहवाल सादर करत मतदारसंघातील समस्या मांडल्या. आम्हाला साथ द्या, बीड जिल्ह्यात शिवसेनेचा भगवा सर्वत्र फडकवू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तर महिला आघाडी मराठवाडा संपर्क प्रमुख संगीता चव्हाण यांनी आपले मत मांडले. दरम्यान, प्रदीप माने यांची शिवसेना बीड विधानसभा संघटकपदी नियुक्ती करण्यात आली.

### महापुरूषांच्या जीवनावर

सुद्धा समाजाला, विद्यार्थ्यांना समजल्या पाहिजेत. महात्मा ज्योतिराव फुले यांनी क्रांतीची सुरूवात केली व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वातंत्र्य समता बंधुता व न्यायिक हक्कांची चळवळ उभा केली. या महापुरूषांनी समाजाशिक्षित असावा समाजामध्ये कोणावरही अन्याय होऊ नाही यासाठी समाजाने सजग असले पाहिजे समाज विज्ञानवादी बुद्धीप्रामाण्यवादी असला पाहिजे, आणि शासनकर्ती जमात बनण्यासाठी सिद्ध असला पाहिजे हे स्वप्न पाहिले होते या स्वप्नांची पूर्तता करण्यासाठी या महापुरूषांचे विचार समजून घेऊन त्याचे प्रत्यक्ष जीवनामध्ये कशाप्रकारे आचरण करता येईल यासाठी प्रत्येक व्यक्तीने प्रयत्न केला पाहिजे हा हेतू ठेवून महात्मा फुले स्मारक समितीतर्फे दरवर्षी अशा प्रकारच्या जनप्रबोधनात्मक विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारे शैक्षणिक व सांस्कृतिक विचार मंच निर्माण केला आहे दरवर्षी या स्पर्धांना विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे असे सांगितले. महात्मा फुले स्मारक समिती तर्फे या विविध स्पर्धांचे प्रकल्प संचालक म्हणून सचिव रत्नदीप गोरे, प्रा.डॉ.मिलिंद ढगे या स्पर्धा यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेत आहेत.

# ऑलिम्पियाडमध्ये शौर्य डोंगरेला गोल्ड मेडल

बीड/ प्रतिनिधी

शहरातील तुलसी इंग्लिश स्कूलमध्ये यूकेजी वर्गात शिकणारा शौर्य सुनील डोंगरे याने राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरील ऑलिम्पियाड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत सुवर्णपदक पटकावले आहे. लहान वयातच मिळवलेले हे यश शाळेसह परिसरासाठी अभिमानास्पद ठरले आहे.



शौर्यच्या या यशामागे त्याची जिद्द, अभ्यासू वृत्ती आणि शिक्षकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले आहे. तुलसी शैक्षणिक समूहाचे संचालक प्रा. प्रदीप रोडे, प्राचार्या उमा जगतकर तसेच वर्ग शिक्षिका फातिमा शहा यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कलागुणांना प्रोत्साहन देत त्यांच्याकडे विशेष लक्ष दिल्यानेच शौर्यसारखे विद्यार्थी उज्ज्वल यश मिळवत आहेत. विशेष म्हणजे, शौर्य डोंगरे याने यापूर्वीही राज्यस्तरीय लिटल कॅम्प ऑन रॅम स्पर्धेत उल्लेखनिय कामगिरी करत पारितोषिक मिळवले होते. त्यामुळे त्याच्या सातत्यपूर्ण यशाची परंपरा कायम राहिली आहे.

शौर्यच्या या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन, शिक्षकवर्ग व पालकांकडून त्याचे कौतुक होत असून, भविष्यातही तो असेच यश संपादन करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. दरम्यान माझा मुलगा शौर्य सुनील डोंगरे याने इतक्या लहान वयात ऑलिम्पियाड परीक्षेत सुवर्णपदक मिळवून आमचं स्वप्न साकार केलं आहे. त्याच्या या यशाचा आम्हाला खूप अभिमान वाटतो. शौर्यने नेहमीच अभ्यासाबरोबर जिज्ञासा आणि सातत्य ठेवले, त्यामुळेच त्याला हे यश मिळालं.या यशामागे शाळेचे संचालक प्रा. प्रदीप रोडे, प्राचार्या उमा जगतकर आणि वर्ग शिक्षिका फातिमा शहा यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. आम्ही त्यांच्या प्रति मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. शौर्यने पुढेही असेच यश मिळवत राहावे आणि मोठं नाव कमवावे, हीच आमची अपेक्षा आहे.

# अतिवृष्टी नुकसानातून अनेक गावे वगळली : राजेंद्र आमटे, राजेंद्र वीर

बीड । प्रतिनिधी

तालुकाच नव्हे तरी संपूर्ण जिल्हाभर अवकाळी अतिवृष्टीमुळे व गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झालेले आहे. शेतकऱ्याच्या शेतातील उभं पिक काढणीला आला असताना अवकाळी मुळे वाया गेले असून ही या अतिवृष्टीतून अनेक गावांना वगळण्यात आले आहे. या गावांचा समावेश करून मदतीची तरतूद करावी अशी मागणी जिल्हाधिकारी यांना दिलेले निवेदनात शेतकरी पुत्रांच्या वतीने करण्यात आली.





शेतकऱ्यांच्या शेतात उभा असणारा गहू ज्वारी बाजरी हरभरा करडई ही पिके पूर्णतः भुईसपाट झाली आहेत तरीही अनेक मंडळातून अधिकाऱ्याच्या गलथान कारभारामुळे अहवालामध्ये यांचा समावेश करण्यात आलेला नाही.

शेती पिकासोबतच अनेकांच्या फळबागा अक्षरशः मोडून गेल्या आहेत. टरबुज, आंबा, चिंच, चिकू मोसंबी, लिंबू, केळी व पपई या फळबागा चे अतोनात नुकसान झालेले आहे. अनेकांच्या फळबागा उद्ध्वस्त झालेले आहेत, तरीही आणि गावांमध्ये अतिवृष्टी न झाल्याचा अहवाल प्रशासनाने दिलेला आहे. अनेक गावे या अतिवृष्टीच्या नुकसानातून वगळली जाणार आहेत म्हणून ज्या काही गावांचे नुकसान झालेला आहे. त्या गावांना पुन्हा नोंदी करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यात यावा अशी मागणी उपजिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने करण्यात आली. यावेळी शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे , राजेंद्र वीर, सामाजिक कार्यकर्ते सुंदरराव चव्हाण, बालाजी पवार ,कैलास थोटे, सचिन काळे, कैलासराव वाघ, आदींच्या वतीने निवेदन देण्यात आले.

# माजी आ.केशव आंधळे यांच्या वाढदिवसाचा खर्च टाळून लोंढे कुटुंबाला आर्थिक मदत

वडवणी । प्रतिनिधी

राजकारणात नेत्यांच्या वाढदिवसानिमित्त मोठ्या प्रमाणावर फ्लेक्स, फटाक्यांची आतिषबाजी आणि गुलालाची उधळण करण्याची परंपरा दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. मात्र या दिखाऊ इव्हेंट संस्कृतीला पूर्णविराम देत वडवणी तालुक्यातील रुई (पिंपळा) येथील आदर्श सरपंच तथा सामाजिक कार्यकर्ते मयुर आंधळे यांनी एक वेगळाच आदर्श घालून दिला आहे त्यांनी शासकीय मदतीसाठी सदैव पाठपुरावा व अग्रेसर असतात गावातील दुर्दैवी ३ घटनांना शासकीय मंत्रालय स्थरावर धावपळ करून मदत सरपंच मयुर आंधळे यांनी मिळवून दिली आहे.

मागील महिन्यामध्ये रुई (पिंपळा) या गावातील अप्पर कुंडलिका मध्यम प्रकल्पचच्या काठावर मोटर चालू करण्यासाठी गेलेल्या गावातील तरुण स्व. पांडुरंग जालिंदर लोंढे या २८ वर्षीय तरुणचा पाय घसरून पडल्याने पाण्यामध्ये बुडून मृत्यू झाला होता त्या अनुषंगाने आपण त्या कुटुंबासाठी काहीतरी करूयात हा मनाचा संकल्प सरपंच मयूर आंधळे यांच्या मनात होता त्यांनी आपल्या काकाच्या म्हणजे माजी आमदार केशवदादा आंधळे यांच्या वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्च टाळत जालिंदर लोंढे यांना मोठी आर्थिक मदत केली. या स्तुत्य उपक्रमामुळे संपूर्ण वडवणी तालुक्यात त्यांचे कौतुक होत असून माणुसकी पॅटर्न म्हणून या उपक्रमाची जोरदार चर्चा रंगली आहे.

अपघातग्रस्तांसाठी धावणारा देवदूत



आदर्श सरपंच मयुर आंधळे यांचा माणुसकी पॅटर्न

म्हणून सरपंच मयुर आंधळे हे केवळ एका उपक्रमापुरते मर्यादित नसून संपूर्ण जिल्ह्यात एक सक्रिय आणि संवेदनशील सामाजिक कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. ग्रामीण भागातील एखाद्या कुटुंबावर अपघात किंवा नैसर्गिक संकट ओढवले की ते तत्काळ मदतीसाठी धाव घेतात.

ते केवळ वैयक्तिक पातळीवर आर्थिक मदत करत नाहीत तर अपघातग्रस्त किंवा मृतांच्या वारसांना शासकीय मदत मिळवून देण्यासाठी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करतात. त्यांच्या प्रयत्नांमुळे अनेक गरजू कुटुंबांना वेळेत शासनाचा निधी मिळाल्याने त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

नेत्यांचा वाढदिवस म्हणजे कार्यकर्त्यांसाठी उत्सवाचा क्षण असतो. मात्र,सरपंच मयूर आंधळे यांनी या उत्साहाला सेवेची जोड देत एक नवा आदर्श निर्माण केला आहे. घोषणाबाजी आणि दिखाऊ कार्यक्रमांपेक्षा प्रत्यक्ष कृतीतून समाजासाठी काम करणे हीच खरी सेवा असल्याचा संदेश त्यांनी दिला आहे.

जालिंदर लोंढे कुटुंबाच्या डोळ्यातील अश्रू पुसत सरपंच मयुर आंधळे यांनी माजी आमदार केशवदादा आंधळे यांना वाढदिवसाची एक अनमोल भेट दिली आहे. यावेळी ग्रामपंचायतचे विद्यमान उपसरपंच मा. श्री. सुधाकर आप्पा लोंढे पाटील, ग्रामपंचायत सदस्य मा. श्री. कृष्णा नाना खाडे, ग्रा.प. सदस्य मा. श्री. अशोक विष्णू लोंढे, ग्रा.प. सदस्य ना. श्री. बाबासाहेब धर्मराज आंधळे, ग्रा. प. सदस्य मा. श्री. अशोक महादेव लोंढे, सेवा सोसायटी सचिव मा. श्री. बालासाहेब सोपान आंधळे, ज्येष्ठ व्यापारी मा. श्री. गोरख तात्या आंधळे, मा. श्री. कृष्णा आंधळे पाटील, मा. श्री. भागवत लोंढे, श्री. उमेश आंधळे, श्री. कृष्णा महादेव आंधळे, लोकपत्रकार श्री. बाप्पासाहेब भांगे हे उपस्थित होते.

### जाहीर प्रगटन

तहसील कार्यालय, गेवराई ता. गेवराई जि.बीड
(दंड विभाग)

दुरध्वनीक्र. ०२४४७-२६२१४५
क्र.२०२५/दंड/कावि- दिनांक ०२/०१/२०२६
विषयः जन्म नोंद आदेश मिळणे बाबत.
संदर्भ:
-१. शासन निर्णय क्रमांक जम्रना२५२५/ईऑ ९९११८१)/ प्र.क्र/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५
२. अर्जदार राऊत लखुभाऊ सखाराम रा. पाडळसिंगी ता. गेवराई जि. बीड यांचा अर्ज दिनांक ०५.१२.२०२५

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, कृपया संदर्भीय अर्ज क्र ०१ व ०२ चे अवलोकन व्हावे, प्रकरणात संदर्भ क्र ०२ नूसार अर्जदार राऊत लखुभाऊ सखाराम रा. पाडळसिंगी ता. गेवराई जि.बीड यांनी अर्ज देवून अर्जदार यांचा जन्म दिनांक १३.०६.१९७९ रोजी नोंद करावयाचे राहून गेल्याने प्रकरणात जन्म आदेश मिळणे बाबत या कार्यालयास संदर्भीय अर्जाव्दारे विनंती करण्यात आलेली आहे.

करीता उकत अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक जम्रना२५२५/ ईऑ९९११८१)/प्र.क्र/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५ नुसार प्रकरणात पो.स्टे गेवराई यांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक जन्म ठीकाणचा व रहीवासीचा तपास करून पोलीस निरीक्षक यांनी चौकशी अहवाल सादर करावा, तसेच ग्राम महसूल अधिकारी पाडळसिंगी यांनी अर्जदाराचे स्थानीक रहीवासीचा स्थानीक चौकशी/पंचनामा करून वस्तूस्थीतीदर्शक अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

**स्वाक्षरित/-**
**तालूका दीडाधिकारी गेवराई**

# शेतीमालांवरील वायदे बंदी अन्यायकारक

## वायदे बाजार बंदीला आणखी एक वर्ष मुदतवाढ; आंदोलनाचा इशारा

मुंबई : केंद्र सरकारने सात शेतीमालांवरील वायदे बाजार बंदीला आणखी एक वर्ष मुदतवाढ देण्याचा घेतलेला निर्णय शेतकऱ्यांवर तसेच शेतीमाल व्यापाराशी संबंधित घटकांवर अन्यायकारक असून ही बंदी मागे न घेतल्यास 'सेबी' कार्यालयासमोर पुन्हा आंदोलन करण्याचा इशारा शेतकरी संघटनेचे राज्य कार्यकारिणी सदस्य विलास ताथोड यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे दिला.

ताथोड म्हणाले, की 'सेबी'ने २०२१ पासून सात प्रमुख शेतीमालांना वायदे बाजारातून वगळले असून, दरवर्षी त्याला मुदतवाढ देऊन ही बंदी कायम ठेवण्यात येत आहे. यामुळे शेतीमालाच्या व्यापारात अनावश्यक हस्तक्षेप होत असून शेतकऱ्यांचे तसेच देशाच्या अर्थव्यवस्थेचे नुकसान होत आहे. वायदे बाजार ही शेतकऱ्यांसाठी उपयुक्त यंत्रणा आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांना ४ ते ५ महिने आधीच दरांचा अंदाज मिळतो. यामुळे शेतकरी योग्य नियोजन करू शकतो, माल साठवणूक करायचा की नाही याचा निर्णय घेऊ शकतो तसेच कोणते पीक घ्यायचे या बाबतही अधिक सुजाण निर्णय घेता येतो. अनेक शेतकरी व शेतकरी उत्पादक कंपन्या या यंत्रणेचा वापर करून नफा मिळवत होत्या, मात्र केंद्र शासनाच्या दबावामुळे सेबीकडून हा निर्णय घेतला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. सेबी ही स्वायत्त संस्था असून तिचे कर्तव्य वायदे बाजाराला प्रोत्साहन देणे आहे, बंदी घालणे नाही, असेही त्यांनी नमूद केले.






## जागतिक दिवस: 'जागतिक कोंकणी भाषा दिन'

### महत्वाच्या घटना

१८७५ : महर्षी स्वामी दयानंद यांनी आर्य समाजाची स्थापना केली.
१८८९ : भारतीय कलाविष्कार,जिम्नॅस्ट, बलूनिस्ट, पॅराशूटिस्ट आणि देशभक्त रामचंद्र चटर्जी गरम फुग्यातुन उड्डाण करणारे तसचं, पॅराशूटमध्ये उतरणारे पहिले भारतीय नागरिक ठरले.
१९१२ : इंग्लंडमधील साऊथॅम्प्टन बंदरातुन 'टायटॅनिक' जहाजाचे पहिल्या (व शेवटच्या) सफरीवर प्रयाण.
१९१७ : गांधी चंपारण्याला आगमन
१९५५ : योहान साल्क या शास्त्रज्ञाने सर्वप्रथम पोलिओ लशीची यशस्वी चाचणी केली.
१९७० : पॉल मेकार्टनीने व्यक्तिगत आणि व्यावसायिक कारणास्तव द बीटल्स सोडण्याचे जाहीर केले.
१९८२ : भारताचा पहिला उपग्रह इन्सॅट वन याचे अंतराळात उड्डाण.
२००१ : भारत व इराण या दोन देश दरम्यान तेहरान घोषणा पात्रांवर हस्ताक्षर करण्यात आले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७५५ : डॉ. सामुएल हानेमान, होमिओपॅथीचे जनक.
१८४३ : रामचंद्र भिकाजी गुंजीकर – 'मोचनगड' या मराठीतील पहिल्या ऐतिहासिक कादंबरीचे लेखक आणि 'विविध ज्ञानविस्तार' मासिकाचे संपादक (मृत्यू: १८ जून १९०१)
१८४७ : जोसेफ पुलित्झर – हंगेरीयन-अमेरिकन राजकीय नेते आणि प्रकाशक, वृत्तपत्र क्षेत्रात विशेष कामगिरी बजावणार्यांना देण्यात येणार्या पुलित्झर पुरस्कारांचे प्रवर्तक (मृत्यू: २९ आक्टोबर १९११)
१८८० : सर सी. वाय. चिंतामणी – स्वातंत्र्यपूर्व काळातील प्रागतिक पक्षाचे नेते व श्रेष्ठ वृत्तपत्रकार, पहिल्या गोलमेज परिषदेचे विशेष अतिथी, उत्तरप्रदेशचे शिक्षणमंत्री (मृत्यू: १ जुलै १९४१)
१८९४ : घनश्यामदास बिर्ला – व्यापारी पार्श्वभूमीतून पुढे येऊन पुढे प्रचंड औद्योगिक साम्राज्य उभारलेले उद्योगपती (मृत्यू: ११ जून १९८३)
१८९७ : भारतीय लेखापाल आणि राजकारणी प्रफुल्लचंद्र सेन यांचा जन्म. (मृत्यू: २५ सप्टेंबर १९९०)
१९०१ : डॉ. धनंजय रामचंद्र तथा द. रा. गाडगीळ – अर्थशास्त्रज्ञ, भारतीय अर्थशास्त्राचे प्रणेते, सहकारी चळवळीचे खंदे समर्थक, पुणे विद्यापीठाचे कुलगुरु (मृत्यू: ३ मे १९७१)
१९०७ : मोतीराम गजानन तथा मो. ग. रांगणेकर – नाटककार, चित्रपट दिग्दर्शक व पत्रकार (मृत्यू: १ फेब्रुवारी १९९५)
१९१७ : भारतीय राजकारणी जगजितसिंह लयलपुरी यांचा जन्म. (मृत्यू: २७ मे २०१३)
१९२७ : मनाली कल्लट तथा एम. के. वैणू बाप्पा – भारतीय खगोलशास्त्रज्ञ. तार्यांची प्रत आणि त्यांच्या वर्णपटातील परस्परसंबंधांची उकल केली. (मृत्यू: १० ऑगस्ट १९८२)
१९२८ : परमवीर चक्र सन्मानित भारतीय सैन्य दलाचे माजी लेफ्टनंट कर्नल धनसिंग थापा यांचा जन्मदिन.
१९३१ : किशोरी आमोणकर – शास्त्रीय गायिका
१९३५ : भारतीय जयपूर घराण्याच्या शास्त्रीय गायीका, शास्त्रीय शैली ख्याल आणि हलकी शास्त्रीय शैली ठुमरी आणि भजन गानसम्राज्ञी किशोरी रवींद्र आमोणकर यांचा जन्मदिन.
१९५२ : भारतीय राजकारणी नारायण राणे यांचा जन्म.
१९७२ : स्काईप चे सहसंस्थापक प्रेसिंड कासासुलु यांचा जन्म.
१९७५ : भारतीय नर्तक आणि कोरिओग्राफर टेरेंस लुईस यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१३१७ : संत गोरा कुंभार.
१६७८ : थोर विदुषी वेणाबाई –रामदासस्वामींची मानसकन्या, प्रवचनकार .
१८१३ : जोसेफ लाग्रांगे – इटालियन गणितज्ञ (जन्म: २५ जानेवारी १७३६)
१९३१ : खलील जिब्रान – लेबनॉनमधे जन्मलेले अमेरिकन कवी, लेखक व कलाकार (जन्म: ६ जानेवारी १८८३)
१९३७ : डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर – ज्ञानकोशकार. 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश' हे त्यांचे सर्वात महत्त्वाचे कार्य होय. (जन्म: २ फेब्रुवारी १८८४ रायपूर, मध्य प्रदेश)
१९४९ : बिरबल सहानी – पुरावनस्पती शास्त्रज्ञ, राष्ट्रीय विज्ञान अकादमीचे अध्यक्ष (जन्म: १४ नोव्हेंबर १८९१ सहारणपूर, उत्तर प्रदेश)
१९६५ : डॉ. पंजाबराव देशमुख – स्वतंत्र भारताचे पहिले कृषी मंत्री, विदर्भात त्यांनी केलेले शिक्षणप्रसाराचे कार्य कर्मवीर भाऊराव पाटलांच्या तोडीचे मानले जाते. (जन्म: २७ डिसेंबर १८९८)
१९९५ : मोरारजी देसाई – भारताचे ४ थे पंतप्रधान, स्वातंत्र्यसेनानी व गांधीवादी नेते, 'भारतरत्न' (जन्म: २९ फेब्रुवारी १८९६)
२००० : डॉ. श्रीधर भास्कर तथा 'दादासाहेब' वर्णेकर – संस्कृत पंडित (जन्म: ३१ जुलै १९१८).

## जमिनीनुसार करा खरीप पिकांसाठी खतांची निवड!

पिकांना खते ही लागवडीपासून ते वाढीच्या वेगवेगळ्या अवस्थेत द्यावी लागतात. पिकांच्या विविध अवस्थेमध्ये वेगवेगळ्या अन्नद्रव्याची आवश्यकता असते. त्यानुसार खताचे व्यवस्थापन करणे फायदेशीर ठरते. मृदा परीक्षणानुसार पिकांना खते देण्याची शिफारस करण्यात येते. यामध्ये स्फुरद पालाशयुक्त खते पिकास उपलब्ध होण्यास वेळ लागतो, त्यामुळे संपूर्ण मात्रा पिक पेरणीच्या वेळेस द्यावी, तसेच आवश्यकता असल्यास त्यांच्या विद्राव्य स्वरुपातील खतांची वेळ फुलोर्याची वेळ, दाणे भरणे वेळेस विद्राव्य खताच्या फवारणीचे अधिक फायदे होतात. नत्रयुक्त खताचा ऱ्हास लवकर होत असल्यामुळे त्यांची आवश्यकतेनुसार दोन ते तीन भागात विभागणी करून त्याची मात्रा पिकात द्यावी.

खतांची निवड : खरीप पिकांसाठी मातीचा प्रकार व पीक यानुसार खताची निवड करावी. माती तपासणीमुळे जमिनीची सुपीकता व गुणदोष याबाबतची माहिती मिळते. जमिनीतील उपलब्ध अन्नद्रव्याचे प्रमाण, जमिनीचा सामू, सेंद्रिय कर्ब, विद्राव्य क्षारांचे प्रमाण इ. नुसार कोणत्या अन्नद्रव्यांची किती गरज आहे. यांचे प्रमाण ठरवता येते म्हणजेच जमिनीचे आरोग्य समजते. बाजारामध्ये अनेक प्रकारची खते उपलब्ध आहेत.

परंतु कोणत्या खतांमध्ये कोणत्या अन्नद्रव्याचे किती प्रमाण व ते कोणत्या स्वरुपात आहे हे पाहून आपल्या पिकासाठी व जमिनीसाठी योग्य आहे का हे पडताळून पाहणे आवश्यक आहे.

अशा प्रकारे केलेला खतांचा वापर मूलभूत शिफारशीपेक्षा जास्त परिणामकारक ठरतो व अनावश्यक खतांचा वापर टाळता येऊ शकतो.

जमीन आणि पिकांनुसार खतांचा वापर : पाणी साचलेल्या जमिनीत नायट्रेटयुक्त खते होत नाही. ज्या जमिनीत गंधकाचे प्रमाण कमी आहे अशा जमिनीत अमोनियम सल्फेट किंवा सिंगल सुपर फॉस्फेट या सारख्या गंधक पुरवणाऱ्या खतांचा वापर करावा. डाळवर्गीय व गळीत पिकांमध्ये गंधकाची आवश्यकता जास्त असते अशा पिकास गंधक पुरवणाऱ्या खतांचा वापर जास्त करावा. क्षारयुक्त जमिनीत युरीया वापरल्यास त्याचे नायट्रेटमध्ये रुपांतर होण्यास विलंब लागतो, परंतु नायट्रेट जमिनीत राहिल्यास पिकास अपायकारक ठरतो. म्हणून अशा जमिनीत युरिया ऐवजी अमोनियम नायट्रेट वापरावे.

आम्लयुक्त जमिनी सोडून इतर जमिनीत पाण्यात विद्राव्य असलेल्या स्फुरदयुक्त खते वापरावीत. उदा. सिंगल सुपर फॉस्फेट.

माती तपासणी अहवालात सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता आढळून आल्यास शिफारसीनुसार सूक्ष्म अन्नद्रव्याची मात्रा सुध्दा द्यावी कारण ही अन्नद्रव्ये सुध्दा मुख्य व दुय्यम अन्नद्रव्याइतकीच महत्त्वाची असतात.







## राज्यात उन्हाळी हंगामासाठी ई-पीक पाहणी सुरु

पुणे : संपूर्ण राज्यात उन्हाळी हंगाम २०२५-२०२६ करिता दिनांक ८ एप्रिल २०२६ पासून ई-पीक पाहणी डिजीटल क्रॉप सर्वे मोबाईल ॲप द्वारे पीक नोंदणी करावयाची आहे. दि. ८ एप्रिल २०२६ पासून राज्यातील सर्व गावांमध्ये उन्हाळी हंगाम २०२५-२०२६ डिजीटल क्रॉप सर्वे पिक पाहणी सुरु करण्यात येत आहे.

या प्रकल्पात शेतकरी स्तरावरून व सहायक स्तरावरून मोबाईल ॲपद्वारे पिकांची नोंद करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे उन्हाळी हंगाम २०२५-२०२६ करिता कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे.

हंगाम – उन्हाळी : शेतकरी स्तरावरील ई-पीक पाहणी कालावधी – ८ एप्रिल २०२६ ते २४ मे २०२६. सहायक स्तरावरील ई-पीक पाहणी कालावधी – २५ मे २०२६ ते ८ जुलै २०२६. डिजिटल क्रॉप सर्वे अंतर्गत १००% ई-पीक पाहणी नोंद करणे बंधनकारक आहे. उन्हाळी हंगामात शेतात उभे असलेले पीक, कायम पड अथवा चालू पड असलेल्या जमिनींची नोंद करणे आवश्यक आहे. शेतकरी स्तरावरून पीक नोंदणी न केलेल्या सर्व शेतजमिनींची १००% ई-पीक पाहणी मोबाईल ॲप द्वारे सहायक स्तरावरून पूर्ण करण्यात येईल याची दक्षता घ्यावी. असे पत्र काढण्यात आले आहे.




## शक्तिपीठ महामार्गाच्या नवीन आराखड्यात बाधित गावांची संख्या वाढली

कोल्हापूर : सुधारित आराखड्यानुसार शक्तिपीठ महामार्ग सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातील राधानगरी-गोवा टायगर कॉरिडॉरजवळून जाणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. जिल्ह्यातील ७३ गावांतून महामार्ग जाणार आहे. शक्तिपीठ महामार्गाच्या मूळ आराखड्यानुसार ६१ गावांतून हा महामार्ग जाणार होता. सुधारितमध्ये यात वाढ झाली आहे. बाधित गावांची संख्या वाढणार असल्याने नुकसानग्रस्त शेतकरी आणि क्षेत्रात वाढ होणार आहे.

शासनाने अंतिम आराखडा मंजूर केला तरी नुकसान भरपाई किती देणार, हे अजून जाहीर केलेले नाही. आता याची प्रतीक्षा लागून राहिली आहे. राज्य शासनाचा ड्रीम प्रकल्प असलेल्या शक्तीपीठ महामार्गाचा सुधारित आराखडा समोर आला आहे. या आराखड्यानुसार व्याघ्र प्रकल्पापासून महामार्ग जाणार असल्याने वाघांच्या अधिवासाजवळ वाहनांची वर्दळ वाढणार आहे. पूर्वीच्या महामार्गाला तीव्र विरोध झालेली गावे वगळण्यात आली आहेत. सुधारित आराखड्यालाही शक्तीपीठ विरोधी कृती समितीने तीव्र विरोध दर्शवला आहे. यामुळे अंमलबजावणी यंत्रणा असलेली महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ सावध भूमिकेत आहे. त्यांनी अजूनही अधिकृतपणे आराखडा प्रसिद्धीस दिलेला नाही. शक्तिपीठ महामार्ग पूर्वी नागपूरपासून सुरुवात होणार होता. सुधारितमध्ये यामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. मात्र महामार्गाचा शेवट गोवा-पत्रादेवीऐवजी पणजी येथे होणार आहे.



## गाई-म्हशीचे चीक; फायदे व दुष्परिणाम

''चीक'' म्हणजे गाई-म्हशी विल्यानंतर पहिल्या तीन ते पाच दिवसात कासेतून येणारा पोषक समृध्द स्त्राव. चीक हा वासरांसाठी संजीवणी असते कारण यातुन वासराना त्यांच्या आयुष्यासाठी प्रथम रोग प्रतिकार शक्ती मिळत असते. चीक हा फक्त वासरांसाठी नव्हे तर माणसासाठी सुध्दा फायदेशीर आहे पण त्याचा योग्य मात्रेत वापर न केल्यास त्याचे दुष्परीणाम होऊ शकतात.

चीक मध्ये असणारे पौष्टिक घटक : चीक हा नवजात वासरांसाठी सपूर्ण आहार असतो. त्यात अनेक प्रकारचे जैविक दृष्टया सक्रिय असे घटक असतात. तसेच त्यामध्ये पौष्टिक घटक हे सामान्य दुधाच्या तुलनेत जास्त प्रमाणात असतात. सामान्य दुधा पेक्षा प्रथिने चार ते पाच पटीने जास्त असतात. उर्जा दिड पटीने जास्त असते. खनिजेही सामान्य दुधा पेक्षा जास्त असतात, त्यातल्यात्यात कॅल्शियम दुप्पट तर फॉस्फरस दिड पटीने जास्त असते. जिवनसत्व 'अ' १० पट, जिवनसत्व 'ई' ६ पट, तर जिवनसत्व 'डी' दुप्पट प्रमाणात असतात. या व्यतिरिक्त 'सी' आणि 'बी' जीवनसत्व ही चागल्या प्रमाणात असतात. रोग प्रतिकार शक्ती वाढवणारे घटक म्हणजेच ईम्युनोग्लोबूलिन (विशेषत: 'जि' आणि 'ए') शंभर पटीने जास्त असतात. तसेच दुधातील सामान्य घटक लॅक्टोज (साखर) योग्य प्रमाणात असते.

वासरांसाठी पहिला चीक अत्त्यंत महत्वाचा : वासरू जन्मल्या नंतर साधारणत: उभे राहून चीक पिण्याचा प्रयत्न करतात. वासराला पहिला चीक जन्मल्या नंतर दोन तासाच्या आत पाजविणे अत्यंत गरजेचे असते. कारण या काळात चीकातील संरक्षकतत्वे लवकर आणि जास्तीत जास्त शोषली जातात. काही वासरं जन्मत: कमजोर असल्यामुळे स्वत:हून चीक पिऊ शकत नाही तर त्यांना चीक हा काढून लहान मुलांसाठी वापरल्या जाणाऱ्या निप्पल-बॉटलचा वापर करून पाजावा किंवा चीक पिण्यासाठी मदत करावी. सुरूवातीच्या तीन ते पाच दिवस चीक हा वासराच्या वजनाच्या दहा टक्के (१०%) इतकाच पाजावा व तसेच त्या चीकाचे विभाजन ३ ते ४ भागात करावे व वासरांना पाजावे. वासराना होण्याऱ्या न्युमोनिया, अतिसार किंवा हगवण इत्यादी घातक रोगाच्या विरूध्द रोग प्रतिकार शक्ती वाढवण्याकरिता चीक हा अत्यंत महत्वाचा आहे.अतिरिक्त असलेल्या चीकाचे संरक्षण : चांगल्या दुधाळ जातीच्या गाईम्हशीत चीकाचे प्रमाण जास्त असल्यामुळे वासराला चीक पुरेसा पाजवून काही प्रमाणात चीक शिल्ल्क राहतो. असे शिल्लक राहिलेले चीक वाया न करता त्याचे योग्य प्रकारे संरक्षण करता येतात.चीक हे कमी तापमानावर रेफ्रिजरेटर (फ्रिज) मध्ये साठवून ठेवता येतो व गरजेनूसार बाहेरकाढून अर्धा ते एक तास ठेवून पुन्हा वापराता येतो. अशाप्रकारे चीकाच्या पौष्टीक घटकात ही कमी प्रमाणातच बदल होतो आणि चीक पून्हा वापरायला चांगलाच असतो.

चीक पाजवण्या बदद्लचे गैरसमज : गाई-म्हशी विल्यानंतर चे पहिल्या चीकाचे सेवन वासरात किंवा माणसात हाणीकारक असते. विलेल्या जनावरांचे झार / वार बाहेर पडल्यानंतरच वासराला चीक पाजावेअन्यथा दुष्परिणामकारक ठरते. चीक अतिरिक्त प्रमाणात असल्यामुळे दुसऱ्या गाई-म्हशीला जेवढे जास्त चीक पाजता येईल तेवढे जास्त पाजावे. चीक पाजल्यामुळे वासराचे पोट खराब होतात आणि हगवण लागते.विषबाधा : वरील नमुद केल्याप्रमाणे पशुपालकातील गैरसमजुतीमुळे विलेल्या जनावरांना किंवा अतिरिक्त चीकाचे प्रमाण असल्यामुळे, गाई-म्हशीला जास्त प्रमाणात चीक पाजल्यामुळे विषबाधा होते. साधारणत: गाई-म्हशीच्या पोटात प्रथिनांच्या पचनामुळे अमोनिया वायू तयार होत असतो. परंतू चिकाच्या अति सेवनामूळे व त्यातील जास्त प्रथिनांमूळे अमोनिया वायूची पोटात मोठया प्रमाणात वाढ होते. अमोनिया मेंदूच्या कार्यासाठी हानीकारक आहे म्हणून अशा जनावरांच्या मेंदूवर परिणाम होऊन झटके यायला सुरूवात होते आणि शेवटच्या टप्यात जास्त प्रमाणात झटके येऊन जनावर दगावण्याची शक्यताअसते.चिक हा लहान वासरांसाठी अमृत आहे. परंतु मोठया जनावरांसाठी ते विषआहे. म्हणून जास्तीचा चीक गायी-म्हशी, शेळया यांना पाजवू नये.



शुक्रवार दि.१० एप्रिल २०२६ ५



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत



# एमआयडीसीमुळे तालुक्याच्या विकासाला नवी दिशा मिळणार-आ. लोणीकर

जालना । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील विकासाचा वेग वाढवण्यासाठी औद्योगिकरण ही अत्यावश्यक बाब आहे. उद्योगधंद्यांच्या माध्यमातून स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत होऊन विकासाचा नवा अध्याय सुरू होऊ शकतो. सध्या रोजगाराच्या मर्यादित संधींमुळे मंठा तालुक्यातील अनेक युवकांना शहरांकडे स्थलांतर करावे लागते. ही परिस्थिती बदलण्यासाठी स्थानिक पातळीवरच रोजगारनिर्मिती होणे आवश्यक आहे. एमआयडीसीमुळे लघु, मध्यम व मोठ्या उद्योगांना चालना मिळून हजारो युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. यामुळे केवळ बेरोजगारी कमी होणार नाही, तर कुटुंबांचे आर्थिक स्थैर्यही वाढेल. मंठा तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी एमआयडीसी उभारणी अत्यंत गरजेची असून, यामुळे तालुक्याच्या प्रगतीला नवी दिशा मिळेल असे प्रतिपादन आ. बबनराव लोणीकर यांनी केले. श्री लोणीकर यांनी आज मंठा तालुक्यातील उमरखेडा, ठेंगेवडगाव आणि टोकवाडी या तीनही गावातील शासकीय जमिनीची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी मंठा एमआयडीसीचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, मंठा एमआयडीसीसाठी आवश्यक असलेल्या सर्व पायाभूत सुविधा येथे उपलब्ध होऊ शकतात. औद्योगिक विकासासाठी आवश्यक असलेली पुरेशी जमीन, सुस्थितीत रस्ते, जलस्रोत, सातत्यपूर्ण वीजपुरवठा आणि आधुनिक दळणवळण सुविधा या सर्व बाबी मंठा तालुक्यात उपलब्ध आहेत. त्यामुळे उद्योग स्थापन करण्यासाठी हा परिसर अत्यंत अनुकूल असल्याचे आ. लोणीकर यांनी नमूद केले.

मंठा तालुक्याच्या औद्योगिक विकासाच्या दृष्टीने भौगोलिक व दळणवळणाच्या सुविधा अत्यंत अनुकूल असल्याचे स्पष्ट केले. पुढे बोलताना श्री



लोणीकर म्हणाले की, मंठा शहरातून छत्रपती संभाजी नगर जालना नांदेड हैदराबाद तसेच शेगावपंढरपूरसोलापूर असे दोन महत्त्वाचे राष्ट्रीय महामार्ग जात असल्यामुळे या भागाला उत्कृष्ट वाहतूक सुविधा उपलब्ध आहेत. त्यामुळे कच्चा माल आणणे आणि तयार माल देशभर पाठवणे सोपे होणार आहे. याशिवाय, जालना एमआयडीसीमधून देशभर स्टीलचा मोठ्या प्रमाणावर पुरवठा होत असून जालना येथे उभारण्यात येणारा ड्रायपोर्ट हा औद्योगिक विकासाला अधिक गती देणारा ठरणार आहे. या सर्व सुविधा लक्षात घेता मंठा हा उद्योगांसाठी अत्यंत धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचा परिसर असल्याचे देखील नमूद केले. एमआयडीसीसाठी आवश्यक असलेल्या पाणीपुरवठ्याबाबतही कोणतीही अडचण येणार नसल्याचे आमदार लोणीकर यांनी स्पष्ट केले. वॉटर ग्रीड योजनेच्या माध्यमातून एमआयडीसीसाठी मुबलक पाणी उपलब्ध करून देता येणार असून, यासाठी आवश्यक तरतूदही करण्यात आलेली आहे. वॉटर ग्रीडच्या रॉ वॉटरचा वापर औद्योगिक गरजांसाठी करण्याची सुविधा उपलब्ध असल्यामुळे भविष्यातील उद्योगांच्या गरजा सहज पूर्ण होऊ शकतील. मंठा तालुक्यामध्ये सोलरच्या माध्यमातून मुबलक प्रमाणात वीज निर्मिती देखील केली जाणार आहे. १०० मेगावॅट प्रकल्प मंठा तालुक्यात उभारण्यात येत आहे त्यामुळे उद्योगासाठी लागणारी मुबलक वीज याच ठिकाणी निर्माण केली जाणार आहे. त्यामुळे पाणी, वाहतूक आणि औद्योगिक पूरक सुविधा या सर्व बाबींचा विचार करता मंठा एमआयडीसी उभारणीसाठी पूर्णपणे सक्षम असल्याचा विश्वास आ. लोणीकर यांनी व्यक्त केला. मंठा तालुक्याच्या औद्योगिक विकासासाठी नियोजनबद्ध आराखडा तयार करण्यात येणार असून प्लॉटिंग, झोनिंग, सांडपाणी व्यवस्थापन, पर्यावरणीय संतुलन, सुरक्षा आणि अग्निशमन सुविधा यावर विशेष लक्ष दिले जाणार आहे. उद्योगांना सुलभ परवानग्या मिळाव्यात यासाठी सिंगल विंडो प्रणाली लागू करण्याचा प्रयत्न केला जाईल, जेणेकरून गुंतवणूकदारांना कोणत्याही अडचणीशिवाय उद्योग सुरू करता येतील. एमआयडीसीमुळे केवळ उद्योगच नव्हे तर पूरक व्यवसायांनाही चालना मिळेल. वाहतूक, गोदाम, सेवा क्षेत्र, लघुउद्योग आणि व्यापार-व्यवसाय वाढतील असेही बबनराव लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले. महिलांसाठीही विविध उद्योगांमध्ये तसेच स्वयंरोजगाराच्या माध्यमातून संधी निर्माण होतील. कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्रांच्या माध्यमातून युवकांना आवश्यक प्रशिक्षण देऊन सक्षम मनुष्यबळ तयार करण्यात येईल. या सर्व प्रक्रियेमुळे मंठा तालुक्यात आर्थिक उलाढाल मोठ्या प्रमाणात वाढेल, नागरिकांचे उत्पन्न वाढेल आणि जीवनमान उंचावेल. स्थलांतर कमी होऊन गावांमध्येच रोजगार उपलब्ध होईल. रस्ते, पाणी, वीज यांसारख्या मूलभूत सुविधांचा विकास होऊन तालुक्याचा चेहरामोहरा बदलणार आहे. त्यामुळे मंठा एमआयडीसी हा केवळ औद्योगिक प्रकल्प नसून तालुक्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी भक्कम पाया ठरणार असल्याचा विश्वास आमदार लोणीकर यांनी व्यक्त केला.

## पत्रकार गजानन माळकर यांना जीवे मारण्याची धमकी

मंठा। प्रतिनिधी

मंठा शहरातील पत्रकार गजानन माळकर यांच्या थेट घरी जाऊन हल्लेखोरांनी लोखंडी रॉडने धमकावत परिसरात दहशत पसरविण्याचा प्रयत्न केला व जीवे मारण्याची धमकी दिली. ही घटना बुधवार ता. ८ रोजी रात्री घडली. पत्रकार माळकर यांच्या तक्रारीवरून मंठा पोलिसांनी गुन्ह्याची नोंद केली आहे. या प्रकारामुळे मंठा शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पत्रकार गजानन माळकर यांनी मंठा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलिसांनी या प्रकरणाची नोंद करीत गुन्हा दाखल केला आहे. घेत तपास सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार दि. ८ एप्रिल २०२६ रोजी रात्री सुमारे दहा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. तक्रारदार गजानन माळकर हे घराबाहेर असताना त्यांच्या पत्नीला उदय घारे केंधळी व ईतर काही इसम घराजवळ आल्याची माहिती मिळाली. संबंधित व्यक्तींनी घराच्या गेटवर लोखंडी रॉडने जोरजोरात मारून करत दहशत निर्माण केली. यावेळी हल्ले खोरांनी " पत्रकाराची बायको आहेस का ? त्या माणसाला घरातून बाहेर काढ " अशा शब्दांत धमकी देण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. तसेच माळकर यांच्या मोबाईलवर संपर्क करून शिवीगाळ केली तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. यामुळे माळकर यांच्या कुटुंबीयांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बातमी प्रसिद्ध केल्याच्या कारणावरून ही धमकी दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या घटनेची नोंद मंठा पोलीस ठाण्यात एनसीआर () स्वरूपात करण्यात आली असून संबंधित संशयितांचा शोध सुरू आहे. पोलीस अधिक तपास करत असून लवकरच दोषींवर कारवाई केली जाईल, अशी माहिती पोलिसांकडून देण्यात आली.

## समृद्धी महामार्गावरील भीषण अपघात प्रकरणी खा. डॉ. काळे यांची ठोस भूमिका

जालना। प्रतिनिधी

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावर मौजे कडवंची (ता. जालना) येथे दिनांक ०१ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या भीषण अपघातात ८ निरपराध महिला कामगारांचा मृत्यू झाल्याची अत्यंत दुर्दैवी घटना घडली असून ५ कामगार गंभीर जखमी अवस्थेत उपचार घेत आहेत. या हृदयद्रावक घटनेने संपूर्ण जिल्ह्यात शोककळा पसरली असून नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना व्यक्त होत आहे. या घटनेची तात्काळ दखल घेत खासदार डॉ. कल्याण काळे यांनी देशाचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांना पत्र पाठवून प्रधानमंत्री राष्ट्रीय राहत निधीतून () पीडित कुटुंबीयांना मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे. त्यांनी मृत कामगारांच्या कुटुंबीयांना किमान



₹२० लाख तर जखमी कामगारांना उपचारासाठी किमान ₹१० लाख आर्थिक सहाय्य तात्काळ देण्याची मागणी केली आहे.

तसेच खासदार डॉ. काळे यांनी मा. जिल्हाधिकारी, मा. पोलीस अधीक्षक आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे मा. मुख्य अभियंता यांना स्वतंत्र पत्रे देऊन या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची ठाम भूमिका मांडली आहे. आपल्या पत्रांमध्ये त्यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे की, ही घटना केवळ अपघात नसून संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांच्या गंभीर निष्काळजीपणामुळे घडलेली आहे. त्यामुळे या प्रकरणात संबंधितांवर भारतीय दंड संहितेनुसार सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. तसेच महामार्गावरील कामगारांच्या सुरक्षेबाबत गंभीर त्रुटी, आवश्यक सेफ्टी किटचा अभाव, तसेच "छोटा हत्ती" वाहनाच्या अनधिकृत प्रवेशाबाबत सखोल चौकशी करण्याचे निर्देश देण्याची मागणी करण्यात आली आहे. संबंधित कंत्राटदारांनी कामगारांना पी.एफ., ईएसआयसी किंवा विमा संरक्षण दिले होते का, याची तपासणी करून दोषींवर फौजदारी कारवाई करण्याचीही मागणी करण्यात आली आहे. खासदार डॉ. काळे यांनी मृत कामगारांच्या कुटुंबीयांना तात्काळ आर्थिक मदत, कुटुंबातील सदस्यांना कायमस्वरूपी नोकरी, तसेच जखमींच्या उपचाराचा संपूर्ण खर्च शासनामार्फत उचलण्याचीही मागणी केली आहे. "निरपराध व कष्टकरी कामगारांच्या मृत्यूला जबाबदार असणाऱ्यांना कोणतीही सूट मिळू नये. पीडित कुटुंबांना न्याय मिळवून देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे," असे ठाम मत खासदार डॉ. कल्याण काळे यांनी व्यक्त केले आहे. सदर प्रकरण अत्यंत संवेदनशील असून प्रशासनाने तात्काळ व प्रभावी कारवाई करून दोषींना कठोर शिक्षा करावी, अन्यथा जनतेच्या भावना अधिक तीव्र होण्याची शक्यता असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.

## सालसिद्धबाबा यात्रेनिमित्त मांसविक्री बंद करण्याची विहीप व बजरंग दलाची मागणी

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील मिडसांगवी येथे होत असलेल्या सालसिद्ध बाबा देवस्थानच्या यात्रेला रविवारपासून प्रारंभ होत असून यात्रेच्या रविवार सोमवार आणि मंगळवार या तीन दिवसात उघड्यावर पशुहत्या व मांस विक्री पूर्णपणे बंद करण्याची मागणी विश्व हिंदू परिषद व बजरंग दल संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे याबाबतचे निवेदन पाथर्डी पोलीस स्टेशनला दिले असून निवेदनात म्हटले आहे की राष्ट्रसंत भगवानबाबांनी मिडसांगवी येथे पशुहत्या बंद केली होती ती परंपरा जोपासणे वारकरी संप्रदायासह सकल हिंदू समाजाचे कर्तव्य आहे म्हणून मीडसांगवी येथील यात्रा काळात उघड्यावर मांस विक्री करणे व पशुहत्या करणाऱ्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

## उमरदरी शिवारात तरुणाचा मृतदेह आढळला

हिंगोली । प्रतिनिधी

सेनगाव तालुक्यातील उमरदरी शेत शिवारात असलेल्या एका अनोळखी तरुणाचा मृतदेह बुधवारी ता ८ सकाळी आढळल्याने परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे. सेनगाव पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन मृतदेहाची पाहणी केली. तरुणाच्या अंगावरील जखमा व चेहऱ्यावरील दगडाचे वार लक्षात घेता त्यांचा खून झाल्याचे प्राथमिक चौकशीत स्पष्ट झाले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सेनगाव तालुक्यातील उमरदरी फाट्याजवळ एक अनोळखी तरुणाचा मृतदेह आढळून आला. सदर मृतदेहाची वय सुमारे पंचवीस वर्षे असून त्याच्या उजव्या हातावर सचिता व एक पाऊल गोंदलेले (टॅटू )काढला असून तर दुसऱ्या हातावर मॉम डॅड व आई वडील लहान मुलाचा हात धरलेला असे छायाचित्र (टॅटू) काढलेले आहे

पोलिस अधीक्षक निलाभ रोहन, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक मोहन भोसले, यांनी घटनास्थळी भेट देऊन तपासासाठी योग्य त्या सूचना पोलिसांना देण्यात आल्या. सदर तरुणाचा मृतदेह कुणाचा आहे निष्पन्न होईपर्यंत मृतदेह हिंगोली येथील शासकीय रुग्णालयाच्या शवागारात ठेवण्यात आला आहे. मृतदेहाच्या अंगावरील जखमांमुळे तसेच दगडाने डोक्यावर वार केल्याचे दिसून आल्याने सदर व्यक्तीचा खून झाल्याचे प्राथमिक चौकशीत स्पष्ट झाली आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक दीपक मस्के, उपनिरीक्षक नागनाथ पाटील,जमादार जीवन मस्के, सुभाष चव्हाण, ओमनाथ राठोड,अमोल चिकने यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणे केली आहे. मयताची ओळख पटविण्यासाठी पोलिसांनी परिसरातील बेपत्ता व्यक्तींची माहिती घेण्याचे प्रयत्न चालवले आहेत

## संत भगवानबाबांनी पशुहत्या बंद केलेल्या मिडसांगवी सालसिद्धबाबाच्या यात्रेला रविवारी होणार सुरुवात

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील मिडसांगवी येथील सालसिद्धबाबा देवस्थानची यात्रा महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे सालसिद्धबाबा नागदेवतेचे महाराष्ट्रात अनेक मंदिरे आहेत परंतु मिडसांगवी येथील सालसिद्धबाबाचे प्रमुख शक्तीपीठ मानले जाते या सालसिद्धबाबा देवस्थान यात्रेला दि.१२ एप्रिल २०२६ रविवारपासून सुरुवात होणार आहे याबाबत आख्यायिका अशी आहे की इसवी सन पूर्व १८ व्या शतकात मिडसांगवी या गावात सालसिद्ध देवस्थानचे लाकडी मंदिर होते या मंदिराची पूजा करण्यासाठी एक साधक होते त्याकाळी परिसरात कुणालाही सर्पदंश झाला तर सालसिद्धबाबाच्या मंदिरात आणून नागदेवतेला प्रसन्न करण्यासाठी नगाडा वाजवला जाई व नवस बोलला जात असे व तेथील देवस्थानचे पुजारी असलेले साधक विष उतरवत असत ही अंधश्रद्धा नसून परिसरातील भक्तांची पारंपारिक श्रद्धा असल्याचे बोलले जाते त्याकाळी राष्ट्रसंत भगवानबाबा यांनी मिडसांगवी येथे येऊन किर्तन प्रवचन आणि समाज प्रबोधनाच्या माध्यमातून पशुहत्या व मांसविक्री बंद केली व सालसिद्ध देवस्थानला भगवानगडाची काही जमीन बक्षीस दिली तेव्हापासून मिडसांगवी सालसिद्धबाबा देवस्थान येथे यात्राउत्सवात पशुहत्या व मांसविक्री पूर्णपणे बंद करण्यात आली होती व नागदेवतेला गुळ भाकर आणि तिळाचा गोड नैवेद्य दाखवला जात होता ती परंपरा आजतायगत परिसरातील सालसिद्धबाबांचे भक्त जोपासत आहेत या सालसिद्ध देवस्थान यात्रेला महाराष्ट्रातील लाखो भाविक भक्त हजर राहण्याची शक्यता आहे.

शनिवारी ११ एप्रिल रोजी सायंकाळी विनोदाचार्य इंदुरीकर महाराज यांचे हरिकीर्तन होणार असून रविवारी सकाळी भगवानगडाचे महंत न्यायाचार्य नामदेव महाराज शास्त्री यांच्या हस्ते पैठणी आणलेल्या कावडीच्या पाण्याने नागदेवतेचे पूजन आणि अभिषेक करण्यात येणार आहे छबीना मिरवणूक कुस्त्यांचा जंगी हंगामा शोभेचे फटाके फोडून यात्रेला उत्साहात सुरुवात होणार असून सोमवारी व मंगळवारी लोकनाट्य तमाशा व सांस्कृतिक कार्यक्रम होऊन यात्रेची सांगता होणार आहे.

मिडसांगवी येथील सालसिद्धबाबा देवस्थान या संस्थांणच्या मठाधिपतीपदी भगवानगडाचे शिष्य ह.भ.प.हनुमंत महाराज शास्त्री कार्यभार पाहत आहेत हनुमंत महाराज शास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली व भगवानगडाचे महंत न्यायाचार्य नामदेव महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी सालसिद्धबाबा यात्रा सामाजिक सलोख्यात पार पाडत असते मिडसांगवी व परिसरातील भाविक भक्त सालसिद्धबाबा यात्रेनिमित्त धार्मिक सांस्कृतिक वैज्ञानिक कार्यक्रमाच्या माध्यमातून सामाजिक संदेश देत असतात भगवानगड परिसराचे पावित्र्य जपणे हेच साधकांचे कर्तव्य आहे -ह भ प हनुमंत महाराज शास्त्री

-मठाधिपती- सालसिद्धबाबा
देवस्थान मिडसांगवी


### प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र हरवले आहे

नाव: सोमनाथ ज्ञानेश्वर सरवदे रा. लऊळ नं.१ ता. माजलगाव जि. बीड या नावाचे प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र लऊळ नं १ ते माजलगाव बस प्रवासा दरम्यान हरवले आहे.तरी कोणास सापडल्यास खालील नंबर वर संपर्क साधा

संपर्क :८०८०१६६५१४



### जाहीर प्रगटन

**मा.श्री. व्ही.सी. जोशी, ९ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ५५२/२०२६**
**ॲड. बी. एन. तावरे यांच्यामार्फत**
**द्वारकाबाई भ्र. सुंदरलाल काळे वि. निरंक**

ज्यापेक्षा सुंदरलाल पि. संतराम काळे हे दिनांक ३१.१२.२०२५ रोजी मौजे तिप्पटवाडी, ता.जि. बीड येथे मयत झालेले आहेत आणि तसेच अर्जदार

१. द्वारकाबाई भ्र. सुंदरलाल काळे, वय ८० वर्षे, धंदा घरकाम, रा. तिप्पटवाडी, ता.जि. बीड २. अभिमन्यू पि. सुंदरलाल काळे, वय ६२ वर्षे, धंदा शेती, रा. तिप्पटवाडी, ता.जि. बीड ३. गणेश पि. सुंदरलाल काळे, वय ५० वर्षे, धंदा शेती, रा. तिप्पटवाडी, ता.जि. बीड ४. विजुकला भ्र. जालिंदर शिंदे, वय ६० वर्षे, धंदा घरकाम, रा. आहेरवडगाव, ता.जि. बीड ५. चंद्रकला भ्र. रगुनाथ सकुंडे, वय ५८ वर्षे, धंदा घरकाम, रा. थालेवाडी, ता. पाटोदा, जि. बीड ६. कांता भ्र. बंडु शेंडगे, वय ५६ वर्षे, धंदा घरकाम, रा. तिप्पटवाडी, ता.जि. बीड ७. शांता भ्र. दिनकर घल्लाळ, वय ४४ वर्षे, धंदा घरकाम, रा. कोल्हारवाडी, ता.जि. बीड अर्जदार क्रं. १ ही मयत नामे सुंदरलाल पि. संतराम काळे यांची पत्नी आहे तर अर्जदार क्रं. २ व ३ हे मयताचे मुले तर अर्जदार क्रं. ४ ते ७ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत. मयताचे आई-वडील यापूर्वीच मयत झालेले आहेत. या अर्जदारां व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत असे वरील अर्जदाराचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहू मयत सुंदरलाल पि. संतराम काळे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख ०९/०६/२०२६ आहे.

आज दिनांक ०९ एप्रिल २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरीत
क.लिपीक

आदेशावरुन
स्वाक्षरीत
अधिक्षक, दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड


## उन्हाळी हंगामासाठी पैठण उजव्या कालव्यातून चार पाणी पाळ्या मिळणार-आ. विजयसिंह पंडित

### कालवा सल्लागार समितीच्या ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडून विविध मागण्या मान्य

पैठण। प्रतिनिधी

जायकवाडी धरणाच्या संदर्भाने सन २०२५-२६ च्या कालवा सल्लागार समितीची बैठक संत ज्ञानपीठ, जायकवाडी धरण, पैठण येथे जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. जायकवाडी धरणाच्या पैठण उजव्या कालव्यावरील सिंचन सुविधांच्या संदर्भात आ. विजयसिंह पंडित यांनी या बैठकीत विविध मागण्या केल्या. उन्हाळी हंगामासाठी विस दिवसांच्या अंतराने चार पाणी पाळ्यांचे नियोजन करण्याची आ. पंडित यांनी केलेली मागणी मंत्री विखे पाटील यांनी मान्य केल्यामुळे लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांसह ग्रामस्थांकडून आनंद व्यक्त केला जात आहे. बैठकीला लोकप्रतिनिधींसह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जायकवाडी धरणाच्या संदर्भाने सन २०२५-२६ च्या कालवा सल्लागार



समितीची बैठक बुधवार, दि.८ एप्रिल रोजी संत ज्ञानपीठ, जायकवाडी धरण, पैठण येथे संपन्न झाली. राज्याचे जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीला मराठवाड्यातील विशेषतः जायकवाडी धरणाच्या लाभक्षेत्रातील खासदार, आमदार, जिल्हा परिषद अध्यक्ष, सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन यांसह लोकप्रतिनिधी आणि जलसंपदा विभागाचे अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत कालव्यावरील सिंचन व्यवस्था वाढविण्याच्या संदर्भाने सविस्तर चर्चा झाली. गेवराई विधानसभा मतदार संघाचे आमदार विजयसिंह पंडित आणि जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांनी या बैठकीत पैठण उजव्या कालव्यावरील सिंचन व्यवस्थे संदर्भात विविध विषयांवर अभ्यासपूर्ण चर्चा करून अनेक मागण्या या बैठकीत मांडल्या. उन्हाळी हंगामासाठी माहे मार्च, एप्रिल, मे व जून या महिन्यांत चार पाणी पाळ्यांचे नियोजन करावे, प्रत्येक पाणी पाळी विस दिवसांच्या अंतराने करावी अशी मागणी या बैठकीत आ. विजयसिंह पंडित व अमरसिंह पंडित यांनी केली. कालव्याच्या अस्तरीकरणामुळे मोठ्या प्रमाणावर पाणी बचत होत असल्यामुळे उन्हाळ्यात सिंचनासह पिण्याच्या पाण्यासाठी चार पाणी पाळ्यांची गरज असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी सकारात्मक प्रतिसाद देत ही मागणी मान्य करून उन्हाळी हंगामासाठी चार पाणी पाळ्या देण्याचे मान्य केले. नदी पात्रातील बॅरेजचे उन्हाळ्यात पुर्नभरण करावे, चाऱ्या, वितरीका यांसह कालव्याच्या वितरण प्रणालीची दुरुस्ती तातडीने करावी, पैठण कालव्यासाठी नियोजित २५५ दलघमी पाणी पूर्ण उपलब्ध करावे, अस्तरीकरणाची कामे पूर्ण झाल्यानंतर त्रयस्त यंत्रणेकडून वहनक्षमतेची चाचणी करावी यांसह विविध मागण्या आ. विजयसिंह पंडित यांनी या बैठकीत केल्या. सिंदफणा नदीवरील सिरसमार्ग बॅरेजच्या बुडीत क्षेत्रातील रस्त्यांची कामे करावीत, राक्षसभुवन, रोहितळ, सेलु आणि कोल्हेर येथे काट नियामक छेद (एस्केप) ची कामे करावीत, टाकरवन, बेलगाव, टाकळगव्हाण आणि सेलु येथे कालव्यावरील पुलांची कामे करावीत यांसह विविध मागण्या माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी या बैठकीत केल्या. आ. विजयसिंह पंडित आणि माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी केलेल्या मागण्यांच्या अनुषंगाने जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. या मागण्यांबाबतचे लेखी निवेदनही आ.पंडित यांनी जलसंपदा मंत्री यांना दिले.

# कंत्राटदार काझी संघाणी ग्रुपला बजावली नोटीस

## बसस्थानकाला गळती प्रकरण : माध्यमांच्या रेट्यानंतर अधिकाऱ्यांचे डोळे उघडले

**बीड । प्रतिनिधी**

**दिनांक एक व दोन एप्रिल रोजी झालेल्या अवकाळी पावसामध्ये १३ कोटी रुपये खर्च करून बांधलेल्या बीड बस स्थानकाच्या नव्या इमारतीला गळती लागल्याने कंत्राटधाराचे पितळ उघडे पडले होते मात्र कंत्राट दाराला वाचवण्यासाठी बीडमधील महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी कंत्राटदाराची चूक नसल्याचा हास्यास्पद खुलासा केला होता याप्रकरणी दैनिक राज्य लोकतंत्रणे प्रवाशांची बाजू लावून धरत हे काम निकृष्ट असल्याचे स्पष्ट केले होते याची दखल घेत अखेर एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी कंत्राटदार काळजी संघांनी ग्रुपला दोषी धरत नोटीस बजावली असून वेळेत पूर्ण काम करून महामंडळाकडे हस्तांतर करावे असेही बजावले आहे.**

बीड शहरातील मध्यवर्ती बस स्थानकासाठी राज्य शासनाने १३ कोटी रुपये मंजूर केले होते हे १३ कोटी रुपये मंजूर केल्यानंतर कंत्राटदार काझी संघांनी ग्रुपने बस स्थानकाचे काम केले मात्र काम अर्धवट असतानाच बसचा थांबा आणि प्रवासी निवारा सुरू केला गेला शिवाय महामंडळाकडे या कामाचे व इमारतीचे हस्तांतरण देखील केले नाही एक व दोन एप्रिल रोजी झालेल्या जोरदार पावसामध्ये पूर्ण इमारत गळू लागली यासंदर्भात दैनिक राज्य लोकतंत्रणे प्रवाशांचा आवाज म्हणून बातमी प्रकाशित केली यासोबतच अनेक माध्यमाने देखील याची दखल घेतली कंत्राट दाराचे या निकृष्ट कामामुळे तिथं उघडे पडले मात्र त्यावर पांघरून घालण्याचे काम महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी केल्याचे दिसून आले सुरुवातीला बातमी आल्यानंतर त्यांनी खुलासा केला या खुलासा मध्ये त्यांनी चक्क कंत्राटदाराचा दोष नसल्याचे सांगताना इमारतीच्या पुढे प्रवासी निवारा त्यावरील पत्र्यावर पाला आणि धूळ साचल्यामुळे गळती झाली असल्याचे म्हटले गेले त्यानंतर पुन्हा लोकतंत्रणे महामंडळाच्या अधिकाऱ्याकडून पाठ राखण होत असल्याची बातमी प्रकाशित केली या बातमीची दखल घेत एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांच्या आपण केलेल्या खुलासा संदर्भातील चूक लक्षात आल्यानंतर त्यांनी लागलीच कंत्राटदार काळजी संघांनी या ग्रुपला नोटीस बजावली नोटीस मध्ये त्यांनी आपण अद्याप इमारतीचे काम पूर्ण केले नाही इमारत बांधकाम पूर्ण करून महामंडळाकडे हस्तांतरण करावे मध्यंतरी झालेली पाणी गळतीही कंत्राटदाराची चूक आहे असे नमूद करून आपणा विरुद्ध दंडात्मक कारवाई का करण्यात येऊ नये असा इशारा देखील विभागीय नियंत्रकाने या नोटीसीद्वारे दिला आहे विशेषता माध्यमाने उठवलेल्या आवाजामुळे अधिकाऱ्यांच्याच आपली चूक लक्षात आली आणि त्यांनी नोटीस बजावली मात्र माध्यमांनी आवाज उठवला नसता तर अधिकाऱ्यांनी कंत्रालदाराची पाठ राखण केली होती हे मात्र निश्चित आहे




**लोकतंत्र इम्पॅक्ट**

### अधिकाऱ्यांच्या चूक लक्षात आली

बस स्थानक गळती नंतर एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी जो खुलासा काढला होता त्या फुलाच्या मध्ये समोरील भागातील पत्र्यावर व इमारतीवर कचरा आणि धूळ साचल्यामुळे जाम झाले आणि पाणी गळू लागले असा खुलासा केला होता विशेषता त्यानंतर आलेल्या बातमीनंतर अधिकाऱ्यांचे डोळे उघडले आणि त्यांनी थेट कंत्रालदाराला नोटीस बजावली माध्यमांच्या रेटयानंतर अधिकाऱ्यांचे कान उघडले असेच म्हणावे लागेल

### कंत्राटदाराला राजकीय वरदहस्त

बीड बस स्थानकाचे काम करणारे कंत्राटदार यांना राजकीय वरदहस्त असल्याचे बोलले जात आहे राज्यभरात त्यांचे अनेक कामे सुरू असून अशाच पद्धतीचे कामे केली जात असल्याचे बोलले जात आहे राजकीय वरदहस्त असल्यामुळेच त्यांची पाठराखण करणारा खुलासा महामंडळाने काढला होता मात्र लोकतंत्रणे आवाज उठवल्यानंतर महामंडळाच्या अधिकाऱ्याला चूक लक्षात आली आणि त्यांनी कंत्राटदाराला नोटीस बजावली



**माजलगाव:– माजलगाव मतदारसंघातील विविध विकास कामांच्या संदर्भात उपमुख्यमंत्री सौ. सुनेत्रा वहिनी पवार यांची आ.प्रकाश सोळंके यांनी भेट घेतली, माजलगाव मतदारसंघाच्या दृष्टीने असणाऱ्या प्रस्तावित विकासकामांबत या बैठकीत चर्चा करण्यात आली.**

## ज्ञानराधा मल्टीस्टेटचे कामकाज आता जिल्हा उपनिबंधक पाहणार

बीड । प्रतिनिधी

बीड येथील ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी ही संस्था अवसायनात आहे. या संस्थेचा कारभार छत्रपती संभाजी नगर येथून जिल्हा उपनिबंधक समर्थक जाधव हे पाहत होते. केंद्र शासनाच्या नव्या नियुक्तीनुसार आता बीडचे जिल्हा उपनिबंधक श्री. सतीश तोटावार हे अवसायक म्हणून कामकाज पाहणार आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील आणि जिल्ह्या बाहेरील ठेवीदारांना आता संपर्कासाठी सोयीचे होणार आहे.

केंद्रीय निबंधक सहकारी संस्था, नवी दिल्ली यांनी दिनांक ०३ मार्च २०२६ रोजी अवसायकाचा पदभार हस्तांतरणाबाबत आदेश दिलेला आहे. या आदेशाप्रमाणे अवसायक म्हणून काम पाहत असलेले छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हा उपनिबंधक श्री. सम्रत जाधव यांनी बीड येथील जिल्हा उपनिबंधक सतीश तोटावार यांच्याकडे दिनांक ८ एप्रिल २०२६ रोजी पदभार सोपवला आहे. तोटावार यांनी या संस्थेचा चार्ज घेतला आहे. जिल्ह्यात ठेविदारांची संख्या मोठी असल्याने आता जिल्ह्यातील ठेवीदारांना स्थानिक स्तरावर संपर्क करण्यासाठी सोपे होईल. या निमित्ताने तोटावार यांना देखील ठेवीदारांशी संवाद साधण्याची संधी निर्माण झाली आहे, असेही ॲड. अजित देशमुख यांनी म्हटले.



**बीड : दैनिक राज्य लोकतंत्रचे उपसंपादक तथा मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके यांचा वाढदिवसानिमित्त सावता परिषदेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी सावता परिषदेचे प्राध्यापक काळे,प्रा. रणजीत आखाडे, बंडू चौधरी सर, युवा नेते सचिन दुधाळ, गणेश ढवळे आदी**

## मिलियाला दणका! अनधिकृत भागशाळा बंद करण्याचे आदेश!

बीड । प्रतिनिधी

येथील मिलिया शाळेने गेल्या अनेक वर्षांपासून सुरु केलेली गांधीनगर भागातील अनधिकृत भागशाळा बंद करण्याचे आदेश देत एक लाख रुपयांचा दंड बीडच्या प्राथमिक शिक्षण विभागाने ठोठवला आहे. शाळा बंद न केल्यास दररोज दहा हजार रुपये दंड करण्यात येईल असे देखील नोटीस मध्ये म्हटलं आहे.

बीड सह जिल्ह्यात अनेक प्राथमिक आणि माध्यमिक शाळा तसेच कॉलेज असलेल्या मिलिया संस्थेला बीडच्या शिक्षण विभागाने मोठा दणका दिला आहे मिलीया प्राथमिक शाळेच्या वतीने शहरातील गांधीनगर भालदार पुरा आणि बालेपिर या तीन ठिकाणी अनधिकृत पणे भाग शाळा भरवण्यात येत होत्या. राज्यात कोठेही भागशाळा सुरू करण्याची परवानगी नसताना बीडच्या मिलिया शाळेने सर्व नियम धाब्यावर बसून गेल्या अनेक वर्षापासून शहरात गांधीनगर भालदार पुरा आणि बालेपिर या भागात भाग शाळा सुरू केल्या.

या अनधिकृत भाग शाळांबाबत अनेक वेळा चालकांनी अधिकाऱ्यांना मॅनेज करून हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क गोळा केले तसेच शासनाकडून देखील वाढीव तुकड्या आणि शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांच्या नावाने कोट्यावधी रुपये उकळले. अनधिकृत भागशाळा भरवून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी बीडच्या प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी किरण कुंवर यांनी शाळेला नोटीस पाठवली आहे. ज्यामध्ये भागशाळा तातडीने बंद करविवारी, तसेच एक लाख रुपये दंड भरावा आणि दिलेल्या मुदतीत शाळा बंद न केल्यास दररोज दहा हजार रुपये दंड करण्यात येईल असे देखील नोटीस मध्ये म्हटलं आहे.

## शिवसैनिकांच्या बळावर केजमध्ये भगवा अधिक मजबुत करू : मनोज शिंदे

### केज तालुक्यात एकाच दिवशी शिवसेनेच्या सात शाखा स्थापन

बीड । प्रतिनिधी

शिवसेना वाढवण्यासाठी प्रत्येकाने आपापल्या भागात सक्रिय राहून जनतेशी संपर्क वाढवावा. कार्यकर्त्यांनी संघटनेशी निष्ठा ठेवून काम करणे गरजेचे आहे. आगामी काळात शिवसैनिकांच्या बळावर केजमध्ये भगवा अधिक मजबुत करू असा ठाम विश्वास शिवसेना बीड जिल्हा संपर्क प्रमुख मनोज शिंदे यांनी व्यक्त केला.




केज तालुक्यातील कासारी, धार्मळा, साबला, लहुरी, येवता, बेंगळवाडी, कोरडेवाडी अशा सात ठिकाणी शिवसेनेच्या शाखांचे उद्घाटन जिल्हा संपर्क प्रमुख मनोज शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपनेत्या संगीताताई ठोंबरे, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक उपस्थित होते. यावेळी शिवसैनिकांनी घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला. यावेळी मनोज शिंदे म्हणाले की, केज तालुक्यातील प्रत्येक गावात, प्रत्येक वाड्या-वस्तीत शिवसेनेचा भगवा पोहोचला पाहिजे हा आमचा निर्धार आहे. नव्याने सुरू झालेल्या या शाखा केवळ नावापुरत्या नसून त्या जनतेच्या प्रश्नांवर लढा देणाऱ्या केंद्रबिंदू ठरतील. आगामी काळात ◀◀ पान ३ वर

## तुम्ही शिवसेना बळकट करा, ताकद देण्याचे काम एकनाथ शिंदे करतील - ना. प्रकाश अबीटकर

बीड । प्रतिनिधी

आगामी काळात राज्याच्या राजकारणात मोठे बदल होण्याची शक्यता असून विधानसभेसह लोकसभेच्या मतदारसंघांमध्ये वाढ होऊ शकते, तसेच महिला आरक्षणाचा महत्त्वपूर्ण कायदा लागू होण्याची शक्यता आहे. या नव्या राजकीय टप्प्यावर शिवसेना स्वतःला सिद्ध करून नव्या जोमाने पुढे येईल, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे आरोग्यमंत्री तथा मराठवाडा संपर्कप्रमुख ना. प्रकाशजी अबीटकर साहेब यांनी केले.

महाराष्ट्र ◀◀ पान ३ वर

### काम करणार तोच पदावर राहणार–पटवर्धन




## मंजरथ येथे भव्य खुल्या कबड्डी स्पर्धेचे आयोजन – सचिन पाडमुख

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील मंजरथ येथे मंजरथ वॉरियर्स क्रीडा मंडळाच्या वतीने भव्य खुल्या कबड्डी स्पर्धेचे आयोजन रविवार, दि. १२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी बीड जिल्हा परिषद बांधकाम व अर्थ सभापती मा. जयसिंग भैया सोळंके हे असणार आहेत. उद्घाटक म्हणून तुळजाभवानी बँकेचे चेअरमन मा. चंद्रकांतजी शेजुळ उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून रिपब्लिकन सेना महाराष्ट्र राज्याचे नेते मा. विजयदादा साळवे तसेच महाराष्ट्र कबड्डी असोसिएशनचे कोषाध्यक्ष मा. मंगलजी पांडे सर उपस्थित राहणार आहेत. यावेळी माजलगाव खरेदी-विक्री महासंघाचे उपाध्यक्ष भालचंद्र पाठक (मंजरथकर) यांचीही प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तसेच मंजरथ गावचे सरपंच भागवत पोहेकर व उपसरपंच काशिनाथ आळसे हे देखील कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत.

## महापुरूषांच्या जीवनावर आधारित सामान्यज्ञान व चित्रकला स्पर्धेत १०० विद्यार्थी सहभागी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील महात्मा ज्योतिराव फुले स्मारक समितीच्या वतीने महापुरूषांच्या जीवनावर आधारित असलेल्या सामान्यज्ञान स्पर्धा तसेच चित्रकला स्पर्धेचे आयोजन महात्मा फुले स्मारक स्थळी करण्यात आले होते. यावेळी तब्बल १०० विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत उस्फूर्तपणे सहभाग नोंदवला.


या प्रबोधनात्मक स्पर्धा परीक्षांचे उद्घाटन महात्मा फुले स्मारक समितीचे अध्यक्ष सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी महापुरूषांच्या मिरवणुका जयंत्या तर निघाल्याच पाहिजेत परंतु, त्यासोबतच त्या महापुरूषांनी आपल्या जीवनामध्ये काय केले आहे, त्यांच्या विचारांचा समाजाला कशाप्रकारे उपयोग होऊ शकतो, त्यांचे जीवन चरित्र कशा प्रकारचे होते, या गोष्टी ◀◀ पान ३ वर



## जनगणना २०२७ अंतर्गत बीड येथे फिल्ड ट्रेनरच्या तीन दिवसीय प्रशिक्षणास प्रारंभ

बीड दि. ९ (जिमाका) : भारताची जनगणना २०२७ अंतर्गत गृह सूचीकरण व गृहनिर्माण जनगणनांना या महत्त्वपूर्ण टप्प्याच्या पूर्वतयारीसाठी बीड जिल्ह्यात फिल्ड ट्रेनर्सच्या तीन दिवशी प्रशिक्षणास प्रारंभ झाला आहे. जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथील जिल्हा नियोजन सभागृहात आयोजित या प्रशिक्षणात जिल्ह्यातील एकूण ९० फील्ड ट्रेनर सहभागी झाले आहेत.

हे प्रशिक्षण दोन टप्प्यात बॅचेस मध्ये आयोजित करण्यात आले असून बॅच क्रमांक एक व दोन साठी दि. ६ एप्रिल ते ८ एप्रिल २०२६ आणि ब्याच क्रमांक ३ साठी दिनांक ९ एप्रिल ते अकरा एप्रिल २०२६ असा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. प्रशिक्षण दररोज सकाळी १०:३० वाजता सुरू होत असून यामध्ये तांत्रिक कौशल्य कार्यपद्धती तसेच प्रत्यक्ष क्षेत्रीय कामकाजाबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात येत आहे. या प्रशिक्षण सत्राचे उद्घाटन जिल्हा जनगणना अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना ते म्हणाले की जनगणना ही केवळ आकडेवारी नसून देशाच्या पुढील दहा वर्षाच्या सर्वांगीण विकासाचा पाया आहे त्यामुळे ही प्रक्रिया वेळेत अचूक व पारदर्शकपणे पूर्ण करणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच घर यादी तयार करताना जिल्ह्यातील प्रत्येक घर व प्रत्येक कुटुंबाची अचूक नोंद होईल यासाठी प्रगनक व प्रर्यवेशकांनी विशेष दक्षता घ्यावी. अशा सूचना फील्ड ट्रेनर्स यांना केल्या. नागरिकांशी सकारात्मक संवाद साधून त्यांचा जनगणनेत सक्रिय सहभाग वाढविण्याचे त्यांनी आवाहन केले. या प्रशिक्षणासाठी मास्टर ट्रेनर म्हणून शैलेश खडसे मुख्याधिकारी नगरपरिषद बीड, अनुज गोठी -- मुंबई, श्रीकांत बनकर -- मुंबई तसेच कैलास बळवंत गटविकास अधिकारी पंचायत समिती अंबाजोगाई यांनी सहभाग नोंदविला मास्टर ट्रेनर्सना प्रत्येक्ष क्षेत्रीय कामकाजा दरम्यांना उद्भवणाऱ्या तांत्रिक अडचणी व त्यावरील उपाययोजनाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी उपजिल्हाधिकारी सामान्य प्रशासन शैलेश सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती.



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# लोणी काळभोरमध्ये गावठी हातभट्टी अड्ड्यावर पोलिसांचा धडक छापा; ४९० लिटर दारू जप्त

लोणी काळभोर : गावठी हातभट्टी दारूची विक्री होत असलेल्या अड्ड्यावर लोणी काळभोर पोलिसांनी छापा टाकला आहे. यामध्ये ४९० लिटर दारूसह ५१ हजार रुपयेंचा मुद्देमाल जप्त केला असून दोघांना बेड्या ठोकल्या आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांनी दिलेल्या माहितीनुसार सदर कारवाई ही कामगिरी लोणी काळभोर ग्रामपंचायत हद्दीतील बाजारमळा परिसरातील मोगले वस्तीच्या कॅनॉलजवळ मंगळवार (७ एप्रिल) रोजी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास केली आहे. यामध्ये शिवाजी सुभाष फंड (वय २७) आणि सागर प्रकाश काळभोर (वय २८) यांना अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी पोलीस अंमलदार अशोक भागवत गिरी यांनी फिर्याद दिली आहे. सागर काळभोर यांच्या पत्र्याच्या घरामध्ये एक इसमाने हातभट्टीची तयार दारू कॅन्डमध्ये भरली असून लोकांना विक्रीसाठी ठेवली आहे.



अशी माहिती पोलिसांना एका खबऱ्या मार्फत मिळाली होती.

माहितीच्या अनुषंगाने पोलिसांनी सदर ठिकाणी छापा टाकला, तेव्हा पत्र्याच्या घरासमोर दोन लोक संशयितरित्या थांबलेले दिसले. पोलीसांची चाहुल लागल्याने गावठी हातभट्टीची दारु विकत घेणारे दोन इसम त्या ठिकाणावरुन पळुन गेले. तर पोलिसांनी घटनास्थळावरून फंड व काळभोर यांना ताब्यात घेतले. पोलिसांनी सदर ठिकाणची पहाणी केली असता, प्लॅस्टिकच्या प्रत्येकी ३५ लिटरच्या एकुण ८३ निळ्या व काळ्या रंगाच्या कॅन्डपैकी १४ कॅन्ड दारूने भरलेली आढळून आले. तसेच त्यांनी ही दारु आलताफ अख्तर उर्फ अली (रा. श्रीगोंदा आष्टी जि.अहिल्यानगर) याच्याकडून विकत आणल्याचे सांगितले. या छाप्यात ४९० लिटर दारू ३०० लिटरचा प्लास्टिक बॅरल असा एकूण सुमारे ५१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुने जप्त करून उर्वरित दारू नष्ट केली. तपासादरम्यान ही दारू बाहेरून मागवून स्थानिक पातळीवर विक्री केली जात असल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी पोलीस ठाण्यात आरोपींच्या गुन्हा दाखल करून अटक केली आहे. ही उल्लेखनीय कामगिरी पुणे शहर पोलीस उपयुक्त डॉ. राजकुमार शिंदे, सहाय्यक पोलीस आयुक्त अनुराधा उदमले, लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक कृष्णा बाबर, अरुण जाधव, पोलीस उपनिरीक्षक दिगंबर सोनटक्के, पोलीस हवालदार अण्णा माने, महेश करे, सागर जगदाळे, पोलीस अंमलदार प्रवीण धडस, अशोक गिरी, सचिन सोनवणे व त्यांच्या सहकाऱ्यांनी केली आहे.

# पिंपरी-चिंचवड पालिकेत ८ दिवसात ५२ कोटींची बिलं? अभिषेक बारणेंचा धक्कादायक आरोप

पिंपरी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या तिजोरीवर एक-दोन नव्हे तर तब्बल ५२ कोटींचा डल्ला मारण्यात आला आहे. हा भ्रष्टाचार दुसरा-तिसरा कोणी नव्हे तर ज्यांच्याकडे हिशोब ठेवण्याची जबाबदारी आहे, त्या मुख्य लेखा आणि वित्त अधिकारी अर्थात कॅफो प्रवीण जैन यांनीच केला, असा गंभीर आरोप स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे यांनी केला आहे.




पालिकेत भाजपची सत्ता स्थापन झाल्यानंतर पहिला अर्थसंकल्प सादर झाला आणि पहिल्याचं आठवड्यात हा अपहार करण्यात आल्याचे पुरावे बारणेंच्या हाती असल्याचं त्यांनी सांगितलं. अनेक महिने बिल लटकवून ठेवणाऱ्यांनी बोगस उपसूचनांच्या नावाखाली अवघ्या आठवड्याभरातचं तब्बल ५२ कोटी रुपयांची बिले अदा केल्याचा खळबळजनक आरोप बारणेंनी केला आहे. तसेच या उपसूचनांवर त्या-त्या प्रभागातील सर्व पक्षीय नगरसेवकांच्या सह्या आहेत. या सह्या नगरसेवकांना अंधारात ठेऊन घेतल्यात की त्या ही बनावट आहेत? याबाबतची शंका ही बारणेंनी उपस्थित केली. संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना याबाबत कोणतीही कल्पना नसल्याचा दावा करत बारणेंनी कॅफोंना घेरलं. स्थायी समिती, सर्व साधारण सभा अथवा महापालिका आयुक्तांच्या मंजुरीनंतर बिलं अदा करावी लागतात. प्रत्यक्षात २४ ते ३१ मार्चदरम्यान कॅफोंनी नियमांना तिलांजली देऊन सत्तरहून अधिक कामांची ५२ कोटींची बिलं अदा केली आहेत. हा भ्रष्टाचार म्हणजे पालिकेची लूट आहे. असे आरोप करत बारणेंनी जैन यांचा कॅफोंचा चार्ज काढून त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी पालिका आयुक्त विजय सूर्यवंशी यांच्याकडे केली आहे

# सातबारा गैरव्यवहार प्रकरणात कारवाई; पुण्यातील ४० अधिकाऱ्यांवर गंडांतर

पुणे: हस्तलिखित सातबारा उताऱ्यातील दोष दुरुस्त करण्यासाठी महसूल अधिनियमाच्या १५५ कलमाचा गैरवापर केल्याप्रकरणी जिल्ह्यातील ४० अधिकाऱ्यांवर कारवाई होणार आहे. या अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी तसेच त्यांची पुणे विभागाबाहेर अकार्यकारी पदावर बदली करण्यात येणार आहे, असे संकेत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

सातबारा उताऱ्यांचे संगणकीकरण करताना त्यात लेखन प्रमादाच्या नावाखाली अनेक चुका झाल्या. त्या चुका दुरुस्त करण्यासाठी तहसीलदार, अधिकाऱ्यांना महसूल अधिनियमाच्या कलम १५५ नुसार अधिकार देण्यात आले आहेत. मात्र, हस्तलिखितांमधील नावे चुकविणे, क्षेत्र चुकविणे, नवीन शर्तीचे शेरे, कूळ कायद्यानुसार दाखल केलेले शेरे, आकारी पडबाबतचे शेरे, वारसांच्या नोंदी वैध आणि कायदेशीर नोंदीच्या दुरुस्त्या केल्याचे आढळले.

याबाबत राज्य शासनाकडे नागरिकांच्या अनेक तक्रारी आल्या होत्या. त्यात सर्वाधिक तक्रारी पुणे जिल्ह्यात आढळल्याने राज्य शासनाने




नाशिकचे विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली होती. समितीने आपला अहवाल नुकताच राज्य सरकारला सादर केला आहे. या अहवालात जिल्ह्यातील १५ अधिकारी अतिगंभीर, ८२ गंभीर आणि ५५ अधिकारी मध्यम स्वरूपाच्या अनियमिततेत दोषी आढळले आहेत. आयुक्तांच्या समितीने ३८ हजार २७ प्रकरणांपैकी २ हजार ३८३ प्रकरणांची प्रत्यक्ष तपासणी केली होती. पुणे जिल्ह्याप्रमाणेच राज्यातील सर्व जिल्ह्यांमधील मागील पाच वर्षांतील कलम १५५ च्या आदेशांची चौकशी करून दोन महिन्यांत अहवाल सादर करण्याचे आदेश राज्यातील सर्व विभागीय आयुक्तांना देण्यात आले आहेत.

**१५ अधिकारी सक्तीच्या रजेवर**

समितीच्या शिफारशींनुसार राज्य सरकारने कारवाई निश्चित केली आहे. 'अ' वर्ग (अतिगंभीर) १३ प्रकरणांत फौजदारी कारवाई आणि कठोर विभागीय चौकशी होणार आहे. राज्य सरकारने या प्रकरणांतील १५ अधिकाऱ्यांना सक्तीच्या रजेवर पाठविले आहे, तर 'ब' वर्गातील (गंभीर) २४७ प्रकरणांत विभागीय चौकशी आणि संबंधित अधिकाऱ्यांची पुणे विभागाबाहेर अकार्यकारी या पदावर बदली करण्यात येणार आहे.

# संधी द्या, महिला सोनं करून दाखवतील! शरद पवारांकडून स्त्री शक्तीचे कौतुक

पुणे । प्रतिनिधी

संधी मिळाली तर कोठल्याही क्षेत्रात जाऊन सोने करण्याची महिलांची क्षमता आहे. त्या कुठेही पुरुषांपेक्षा कमी नाहीत, याचा अनुभव मी वेळोवेळी घेतला आहे. म्हणूनच राज्य कारभार असो की प्रशासन, साहित्य, कला, संस्कृती आणि लष्करातही महिलांची कामगिरी ही देशाला अभिमान वाटावी अशीच आहे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी केले.




११ आणि १२ एप्रिल २०२६ रोजी दिल्ली येथे होणाऱ्या महिला शासकीय अधिकाऱ्यांच्या पहिल्याच मराठी साहित्य संमेलनाच्या संकेतस्थळाचे अनावरण पवार यांच्या हस्ते झाले. या वेळी डॉ. शैलेश पगारिया, शैलेश वाडेकर, अनुज नहार, सरहद संस्थेचे अध्यक्ष संजय नहार, लक्ष्मीकांत खाबिया उपस्थित होते. या संकेतस्थळावर दिल्लीत संमेलनसंदर्भात होणाऱ्या कार्यक्रमांची माहिती उपलब्ध करून दिली जाणार आहे.आज देशात छत्रपती घराण्याचा मोठा सन्मान आहे. त्याच घराण्याच्या छत्रपती महाराणी ताराराणी यांच्या ३५१ व्या जयंती वर्षानिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी सरहद संस्थेच्या पुढाकाराने होणारे हे शासकीय, तसेच प्रशासकीय महिलांचे साहित्य संमेलन पुढच्या पिढ्यांना प्रेरणादायी ठरेल, असे पवार यांनी नमूद केले.

महिलांना संसदेत ३३ टक्के आरक्षणाचे बिल येणार आहे. या संधीची सुरुवात मी मुख्यमंत्री असताना महाराष्ट्रातून केली. हे धोरण आणणारे महाराष्ट्र हे पहिलेच राज्य आहे, याचा मला अभिमान वाटतो. म्हणूनच या शासकीय अधिकाऱ्यांच्या साहित्य संमेलनातून होणारे विचारमंथन समाज आणि देशासाठी अत्यंत महत्त्वाचे असणार आहे, असेही पवार म्हणाले.

# काँग्रेसच्या माघारीनंतर बारामतीत २३ जण रिंगणात

बारामती : बारामती विधानसभेच्या पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवसाअखेर गुरुवारी (दि. ९) ३०



उमेदवारांनी अर्ज माघारी घेतले. या जागेसाठी आता २३ उमेदवार निवडणूक रिंगणात उरले आहेत. निवडणूक बिनविरोध करण्याचे आटोकाट प्रयत्न महायुतीच्या नेत्यांनी केले. काँग्रेसने आपला उमेदवार मागे घेतला; पण अन्य उमेदवारांचे अर्ज माघारी घेण्यात अपेक्षित यश आले नाही.

बारामतीच्या पोटनिवडणुकीसाठी एकूण ५३ अर्ज दाखल झाले होते. त्यातील ६ जणांनी बुधवारी माघार घेतली होती. उर्वरित ४७ जण रिंगणात राहिले होते. त्यात काँग्रेसच्या उमेदवाराचा अर्ज महत्त्वाचा होता. गुरुवारी बारामती दौऱ्यावर असलेल्या खा. शरद पवार यांनी काँग्रेसने विचारले तर निवडणूक बिनविरोध व्हावी, असा सल्ला देऊ, असे सांगत काँग्रेसला अप्रत्यक्ष सल्ला दिला. त्यानंतर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या सूचनेनुसार त्यांचे उमेदवार ॲड. आकाश मोरे यांनी अर्ज माघारी घेतला. त्यांच्यासह अन्य २४ जणांनी गुरुवारी माघार घेतली. त्यामुळे या जागेसाठी आता २३ उमेदवार निवडणूक रिंगणात राहिले आहेत.

बिनविरोध निवडणूक होणार नाही हे अर्जाच्या संख्येवरून दिसत होते. तरीही राष्ट्रवादीने अखेरच्या दिवशी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची आमदार रोहित पवार यांनी भेट घेऊन बारामतीत उमेदवार देऊ नये, अशी विनंती केली होती. त्यामुळे काँग्रेसने आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. अन्य उमेदवारांनाही राष्ट्रवादीने अर्ज मागे घेण्याची विनंती केली; पण ती पूर्ण झाली नाही. दुपारी तीन पर्यंत २४ जणांचेच अर्ज मागे घेण्यात यश आले. आता महायुती-राष्ट्रवादीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांच्यासह अन्य २३ जण निवडणूक रिंगणात राहिले आहेत.

# शाळेच्या ३७ लाखांवर डल्ला! क्लार्कनेच इंटरनेट बँकिंगद्वारे पत्नीच्या खात्यात वळवली रक्कम


नांदेड सिटीतील विद्या प्रतिष्ठानच्या पवार पब्लिक स्कूलमध्ये कार्यरत असलेल्या क्लार्कनेच शाळेची तब्बल ३७ लाखांची अफरातफर केली आहे. इंटरनेट बँकिंगद्वारे ही रक्कम आरोपीने स्वतःच्या पत्नीच्या खात्यात वळविली आहे. या प्रकरणी शाळेच्या प्राचार्या वंदना सचिन जोशी (वय ५५, रा. चंद्रगंगा सोसायटी, आंबेगाव बुद्रुक) यांनी नांदेड सिटी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी राजेंद्र अनपट व त्याची पत्नी अश्विनी अनपट उर्फ अश्विनी तरटे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही घटना ५ नोव्हेंबर २०२४ ते ३ जून २०२५ या कालावधीत घडली. विद्या प्रतिष्ठान ही नामांकित शैक्षणिक संस्था असून तिचे संस्थापक अध्यक्ष ज्येष्ठ नेते शरद पवार आहेत. या संस्थेअंतर्गत येणाऱ्या पवार पब्लिक स्कूलमध्ये आरोपी राजेंद्र अनपट हा क्लार्क म्हणून कार्यरत होता.अनपट याने पदाचा गैरफायदा घेत शाळेच्या खात्यातून परवानगीशिवाय इंटरनेट बँकिंगद्वारे पैसे काढून ते पत्नीच्या खात्यात वर्ग केले. तसेच ही अफरातफर लपविण्यासाठी संस्थेच्या नोंदींमध्ये बनावट कागदपत्रे तयार केली होती. संस्थेच्या लेखापरीक्षणादरम्यान (ऑडिट) ही आर्थिक गैरव्यवहाराची बाब उघडकीस आली. तपासात एकूण ३६ लाख ९९ हजार ९८८ रुपयांची अफरातफर झाल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली.

# पुण्यात चेंजिंग रूममध्ये कॅमेरा, तरुणीचा अश्लील व्हिडिओ रेकॉर्ड केला.; दुकानदाराला अटक

पुणे जिल्ह्यातील कामशेत परिसरात महिलांच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी एक संतापजनक घटना समोर आली आहे. एका कपड्याच्या दुकानात कपडे बदलणाऱ्या महिलेचे छुप्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याद्वारे चित्रीकरण केल्याप्रकरणी दुकानदाराला अटक करण्यात आलीम आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिला कामशेत येथील एका दुकानात खरेदीसाठी गेली होती. यावेळी दुकानदार मुकेश मुथा याने तिला कपडे ट्राय करण्यासाठी स्टोअर रूममध्ये पाठवले. त्या खोलीत सीसीटीव्ही कॅमेरा आहे हे माहिती असूनही आरोपीने जाणीवपूर्वक महिलेची गोपनीयता भंग करून तिचे अश्लील व्हिडिओ रेकॉर्ड केले. जेव्हा पीडित महिलेला या



प्रकाराचा संशय आला आणि तिने जाब विचारला, तेव्हा आरोपीने तिला कोणाकडेही वाच्यता न करण्यासाठी धमकावले आणि दबाव आणण्याचा प्रयत्न केला. मात्र, पीडितेने न घाबरता धैर्याने कामशेत पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. महिलेच्या तक्रारीवरून कामशेत पोलिसांनी तातडीने हालचाली करत आरोपी मुकेश मुथा याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ७७ आणि ३५२ अन्वये गुन्हा दाखल केला आणि त्याला अटक केली. पोलिसांनी आरोपीला न्यायालयात हजर केले असून या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून महिलांच्या सुरक्षिततेसाठी अशा विकृत प्रवृत्तींवर कडक कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# कामशेतमधील दुहेरी खुनाचा उलगडा; सीसीटीव्ही व तांत्रिक तपासाच्या आधारे दोघांना अटक

मंचर : कामशेत (ता.मावळ) शहरांमध्ये रविवारी (ता.२९ मार्च) रोजी रोहिदास चव्हाण व आकाश दत्ता पिंगळे (दोघे रा. साई ता.मावळ ) यांच्या खुनाचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले आहे. सी.सी.टी.व्ही. फुटेजच्या तपासणीनंतर आरोपी रणजीत रामचंद्र वाडेकर (वय ३६) व निखिल जितेंद्र माने (वय २८ दोघे रा.दौंड कॉलनी कामशेत ) यांना अटक केली आहे. जुन्या रागातून सदर घटना घडली आहे.




सी.सी.टी.व्ही. तपासणी, गोपनिय माहीती घेणे, तांत्रीक तपास करणे, तसेच यातील मयत व जखमीचे अंगावरील कपड्यावर रंगाचे डाग असल्याने मजुर कट्ट्यावर शोध घेणे करीता पथक रवाना करुन, गुन्ह्याचा सखोल तपास सुरु केला. अशी माहिती पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदिप सिंह गिल्ल यांनी पुणे येथे गुरुवारी (ता.९) झालेल्या पत्रकार परिषदेत माहिती दिली.

कामशेत येथे झालेल्या दोन्ही गंभीर घटनेने शहरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. सदर घटनेचा पोलीसांनी तत्परतेने तपास करुन रणजीत रामचंद्र वाडेकर (वय ३६) व निखील जीतेंद्र माने (वय २८, दोघे रा.दौंडे कॉलनी. कामशेत, ता.मावळ) त्याचा मित्र रोहीदास चव्हाण यांनी संगनमत करुन आकाश पिंगळे यांचे डोक्यात दगड घालुन त्याचा खुन केला. या घटनेबाबत रोहीदास चव्हाण हा बाहेर चर्चा करत आहे. त्यामुळे आपण पकडले जावु त्याचा भितीयुक्त राग मनात धरुन रणजीत वाडेकर व निखील माने यांनी रोहीदास चव्हाण याचाही खून केला. पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदिप सिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, लोणावळा उपविभागीय अधिकारी गजानन टोम्पे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक आकाश पवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक सतिश पाटील यांच्यासह कामशेत पोलीस पथकाने गुन्ह्याचा तपास केला.

# पाषाण तलावात मृत माशांचा खच; जलजीवन धोक्यात, नागरिक संतप्त

पाषाण तलाव परिसरात गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणात मृत माशांचा खच साचल्याने गंभीर पर्यावरणीय व आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. आधीच जलपर्णीने पूर्णपणे व्यापलेल्या तलावात आता जलजीवन धोक्यात आले असून, परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, मागील पाच दिवसांपासून तलावात हजारोंच्या संख्येने मासे मृत अवस्थेत तरंगताना दिसत आहेत. यामुळे पाण्याची गुणवत्ता अधिकच खालावली असून, दुर्गंधीमुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन त्रस्त झाले आहे. तसेच, कीटकांचा प्रादुर्भाव वाढल्याने आरोग्याचा धोका निर्माण झाला आहे.



तलावात वाढलेल्या जलपर्णीमुळे पाण्यातील ऑक्सिजनचे प्रमाण घटले असून, त्यातच मोठ्या प्रमाणात सांडपाणी थेट तलावात सोडले जात असल्याने परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. परिसरात उभारण्यात आलेले जलशुद्धीकरण केंद्र अपुऱ्या क्षमतेचे असल्याने दूषित पाणी थेट तलावात मिसळत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.

या प्रकरणी पुणे महानगरपालिका प्रशासनावर हलगर्जीपणाचा ठपका ठेवला जात आहे. योग्य वेळी उपाययोजना न केल्यामुळेच ही परिस्थिती उद्भवल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

दरम्यान, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चे पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष संतोष गायकवाड यांनी प्रशासनाला इशारा देत तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. प्रशासनाने लवकरात लवकर मृत मासे व जलपर्णी हटवून तलावाची स्वच्छता न केल्यास आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.नागरिकांकडून तलावातील सांडपाणी रोखण्यासाठी ठोस उपाययोजना, जलशुद्धीकरण केंद्राची क्षमता वाढवणे आणि नियमित देखभाल करण्याची मागणी होत आहे. अन्यथा, ही समस्या आणखी गंभीर होऊन पर्यावरणासोबतच नागरिकांच्या आरोग्यावर मोठा परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.